म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ८१०९१०
दा. क्र. १·८८९९७

IRBK-0112811
IRBK-0112811

दा. ३. ९२८९०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

6 SEP 1973

7 OCT 1973

SEP 1974

SEP 1974

15 SEP 1974

18 SEP 1974

3 JUN 1975

31 JUL 1975

13 MAY 1976

6 NOV 1976

EC 1976

DEC 1976

5 MAY 1977



च्या
कथा
रीनाथ रेगे

4 SEP 1974
अनुक्रमांक ३५३६ नोंद दि. ३०।३।५७
म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १२६९१ नों. दि.
वि. ५१० ५१०

# काश्मीरच्या परीकथा

पंढरीनाथ रेगे

सुमित्र प्रकाशन

IRBK-0112811

त दीड रुपाया

© पंढरीनाथ रेगे

दुसरी आवृत्ती १९६९

प्रकाशिका : सौ. पुष्पलता रेगे
सुमित्र प्रकाशन
बी-६ नवप्रभात सोसायटी,
हनुमान रोड, विलेपारले (पूर्व)
मुंबई ५७ (ए.एस.)

मुद्रक : शंकर रा. सारडा
प्राकृती प्रिंटर्स
८५७ ब शनिवार पेठ
सातारा

# विश्वासघातकी प्रधान

फार वर्षांपूर्वीची गोष्ट. काश्मीरचा राजा एकदा राजवाड्याच्या आपल्या बागेत, आपल्या प्रधानासह हवा खात बसला होता. ही बाग राजा आणि त्याची राणी यांच्यासाठीच होती. दुसऱ्या कुणाला तिथे जायची बंदी होती. राजा एकटा असला, की कधी कधी त्याच्याबरोबर प्रधान असे. परंतु त्या दिवशी त्या बागेत अचानक एक साधू शिरला. पहारेकऱ्याने भीतभीतच राजापाशी येऊन ही बातमी त्याला सांगितली.

'त्या साधूला माझ्याकडे घेऊन ये,' राजाने पहारेकऱ्याला फर्मावले.

थोड्याच वेळात, एका म्हाताऱ्या साधूला ओढीत आणून पहारेकऱ्याने राजापुढे उभे केले.

'महाराज, मी आपला गुन्हा तरी कोणता केला?' साधूने शांतपणे विचारले. आणि राजाने काही उत्तर देण्याआधीच तो साधू जमिनीवर कोसळला; जसा काही मरून पडला. हा प्रकार पाहून राजा आणि प्रधान बावरून गेले. पण साधू मरून पडून क्षणभर

झाला नाही तोच, बाजूच्या फुलझाडांपाशी आधीच मरून पडलेला एक पोपट जिवंत झाला. एवढेच नव्हे, तर पंख फडफडवीत आकाशात उडूनहि गेला.

हा अद्भुत प्रकार पाहून राजा व प्रधान आश्चर्याने थक्कच झाले. पण गंमत अशी, की त्यांचा आश्चर्याचा भर ओसरण्यापूर्वीच तो पोपट उडत बागेत परत आला आणि त्यांच्या पायाशी पुनः मरून पडला.

पोपट मरून पडताच, तिकडे मरून पडलेल्या साधूच्या अंगात पुन्हा जीव संचारला आणि क्षणभरात तो उठून उभा राहिला. काहीच घडले नाही अशा प्रकारे तो हसू लागला.

हा सारा चमत्कार पाहून राजा व त्याचा प्रधान यांनी साधूचे पाय धरले. कारण साधूच्या अंगी अद्भुत शक्ती आहे अशी त्यांची खात्री पटली होती.

प्रत्यक्ष राजाने आपले पाय धरले हे पाहून साधूला त्याची दया आली. मग त्याने राजाला नि प्रधानाला या चमत्काराचे गुपित सांगून टाकले

त्यानंतर असेच काही दिवस निघून गेले. एके दिवशी राजा आपल्या प्रधानासह अरण्यात शिकारीला गेला. तेव्हा एक सुंदर हिरवा पोपट वाटेत मरून पडलेला आढळला ते पाहून साधूने शिकविलेल्या विद्येची राजाला आठवण झाली. त्याबरोबर त्या विद्येचा उपयोग करून

मेलेल्या पोपटाला जिवंत करायची इच्छा त्याला झाली. प्रधानालाहि ती विद्या माहीत होतीच म्हणून राजा प्रधानाला म्हणाला,

' प्रधानजी, साधूने आपल्याला शिकवलेल्या विद्येचा पडताळा आपण पाहू या. त्या पोपटाच्या मेलेल्या शरीरात तुमचा प्राण घाला नि त्याला जिवंत करा पाहू. थोडा वेळ आपण गंमत पाहू. मग तुम्ही पुन्हा तुमच्या देहात परत या. '



परंतु प्रधान काही या गोष्टीला कबूल होईना. राजाने कितीहि विनवले तरी तो तयार होईना. आपल्याला धाडस होत नाही असे तो सांगू लागला. याबाबतीत राजाला त्याला सक्ती करता येईना. पण त्याबरोबरच त्या विद्येचा उपयोग करून पाहण्याचा मोहहि त्याला आवरेना. शेवटी स्वतःच तो प्रयोग करून पाहण्याचे त्याने ठरवले.

'बरं तर; मीच स्वतः तो प्रयोग करून पाहतो,' राजा म्हणाला.

मग काय? क्षणभराचं काम! राजा लगेच जमिनीवर मरून पडला आणि पोपटाच्या शरीरात त्याचा प्राण जाऊन तत्काल तो पोपट जिवंत होऊन उडाला.

प्रधान मोठा कावेबाज होता. त्याला हेच पाहिजे होते. राजा पोपट होऊन उडून गेलेला पाहताच तो कपटी प्रधान मनमुराद हसला. ही संधी साधून त्याला राजा व्हायचे होते. म्हणून बिलकूल वेळ न गमावता तो लगेच स्वतः मरून पडला. तावडतोब आपला प्राण त्याने राजाच्या मरून पडलेल्या शरीरात घातला नि क्षणभरातच तो स्वतः राजा बनला. एवढेच नव्हे, तर पोपट बनलेल्या राजाला परत संधी मिळू नये म्हणून आपले-मेलेले शरीर त्याने पुरूनहि टाकले.

झाले!....प्रधान स्वतः राजा म्हणून मिरवीत राजवाड्यात गेला. खरा प्रधान कुठेतरी बाहेरदेशी गेल्याची समजूत त्याने करून दिली.

आपला बेत नीट पार पडावा म्हणून, पोपट बनलेल्या राजाचा नायनाट करण्याचेहि त्याने ठरवले. त्यासाठी राज्यात सापडतील त्या पोपटांना तावडतोब मारून टाकण्याचा हुकूम, राजा बनलेल्या प्रधानाने म्हणजेच प्रधान- राजाने सोडला. मारलेल्या प्रत्येक पोपटामागे बक्षीस मिळेल असेहि त्याने जाहीर केले.

इकडे, पोपट बनलेला राजा जिथे पोपट बनला होता तिथे थोड्या वेळाने परत आला. पहातो तो राजाचे शरीर जागेवर नाही. एवढेच नव्हे, तर प्रधानहि नाहीसा झालेला म्हणून त्याने तपास केला. तर प्रधानच स्वतः राजा बनून मिरवीत असल्याचे त्याला कळले. आपला निकाल लागावा म्हणून पोपटांना मारण्याचे सत्र सुध्दा झाल्याचेहि त्याला कळले. प्रधानाने कपटाने आपला विश्वासघात केला हे पाहून पोपट बनलेल्या राजाला म्हणजेच पोपट-राजाला फार दुःख झाले. आता काय करायचे ? अशी चिंता त्याला पडली. प्रयोग त्याच्या चांगलाच अंगाशी आला होता. विचार करता करता त्याला त्या साधूची आठवण झाली. लगेच तो त्या साधूच्या आश्रमात भरारत गेला.

प्रधानाने आपला विश्वासघात कसा केला ते पोपट–राजाने साधूला सांगितले, नि तो म्हणाला, 'यातून मार्ग कसा काढावा ते आपणच सांगावे महाराज.'

साधूने पोपट–राजाच्या पाठीवरून मायेने हात फिरवीत म्हटले, ' काही काळजी करू नकोस, बेटा. सर्व काही ठीक होईल. पण तू उतावीळ होऊ नकोस. जरा दमाने घे. ईश्वर सर्व काही पहात असतो. तो तुला न्याय दिल्याशिवाय राहणार नाही. योग्य वेळ येताच तुझ्या प्रधानाला त्याच्या कर्माचं फळ भोगावं लागेल. '

असेच आणखी काही दिवस निघून गेले एके दिवशी प्रधान-राजा घोड्यावर बसून अरण्यात शिकारीला गेला होता. तो

त्याच्या समोरून एक अतिशय सुंदर हरीण झपाट्याने धावत गेले. प्रधान–राजाला ते हरीण खूपच आवडले. काहीहि करून ते पकडायचे असा बेत त्याने केला आणि म्हणून आपल्या घोड्याला पिटाळीत तो त्या हरणामागे लागला. परंतु ते हरीण आधीच पुढे धावत गेलेले. त्यातून प्रधान–राजा पाठलाग करू लागलेला आहे हे पाहून ते हरीण वाऱ्यासारखे भरधाव पळत होते. त्यामुळे कितीहि घोडदौड केली तरी हरीण काही प्रधान-राजाच्या तावडीत सापडेना.

शेवटी घोडाच दमून भागून अडखळू लागला. हरीण आपल्या हातून आता निसटणार म्हणून प्रधान–राजा निराश होऊ लागला. आपल्या प्रयत्नाला यश आले नाही म्हणून त्याला खंत वाटू लागली.

तेवढ्यात अचानक त्याची नजर जवळच मरून पडलेल्या एका चित्त्यावर गेली. त्याला पाहून प्रधान-राजाला एक कल्पना सुचली. चित्त्याची धाव हरणापेक्षा खात्रीने किती तरी जलद असते. तेव्हा आपण चित्ता बनून हरणाचा पाठलाग केल्यास हरीण नक्की सापडेल. ही कल्पना सुचताच आपले शरीर टाकून प्रधान–राजाने आपला प्राण त्या मेलेल्या चित्त्याच्या अंगात घातला आणि लगेच चित्ता बनून तो वेगाने दौडत हरणामागे लागला.

हा सगळा डाव साधूनेच रचला होता. साहजिकच पोपट–राजाहि संधीची वाट पहात जवळपासच लपून राहिला होता. चित्ता बनून प्रधान दौडत गेल्याबरोबर क्षणार्धातच राजाने पोपटाचे शरीर टाकून दिले. प्रधानाने अविचाराने टाकून दिलेल्या स्वतःच्या शरीरात

लगेच प्रवेश केला. तेवढ्यात पाठीमागून राजाचे सरदार घोड्यावरून आले. अर्थात राजात झालेला बदल त्यांना समजण्यासारखा नव्हता.

आता खऱ्याखुऱ्या राजाने त्यांना हुकूम सोडला, ' काहीहि करून तो चित्ता जिवंत पकडून आणा. '

—आणि स्वतः राजा घोड्यावर बसून राजवाड्याकडे खुषीने परतला.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो प्रधानचित्ता जिवंत पकडून एका पिंजऱ्यात घालून राजापुढे आणण्यात आला. त्याला हिणवीत राजा म्हणाला, ' हेच का आमचे प्रधानजी ? अशा रानटी पशूला का प्रधान राहू द्यायचं ? अर्थातच हे जमण्यासारखं नाही ! '

आणि मग त्या चित्त्याला ठार मारण्याचा हुकूम राजाने सोडला. अशा प्रकारे त्या विश्वासघातकी प्रधानाचा पार निकाल लागला.

त्यानंतर राजा सुखासमाधानाने राहू लागला. साधूने शिकवलेल्या विद्येचा त्याने परत कधीहि उपयोग केला नाही हे सांगायला नकोच. एवढा जालीम अनुभव आल्यानंतर, विषाची परीक्षा कोण पाहील ? भलता धोका कोण पत्करील ? आपले राज्य भले की आपण भले असे मानून तो काश्मीरचा कारभार नीट चालवित राहिला.

# पंचकथासार

प्राचीन काळची गोष्ट. चौघे मित्र एका लांबच्या प्रवासाला निघाले होते. प्रवासाचा शीण कमी करण्यासाठी प्रत्येकाने आप-आपल्यापरी गोष्टी सांगायला सुरुवात केली. पण लौकरच त्यांच्या गोष्टी संपुष्टात आल्या.

तेवढ्यात त्यांची एका अनोळखी ब्राह्मण वाटसरूशी गाठ पडली. त्यांच्या जवळच्या गोष्टींची पुंजी संपलीच होती; त्यामुळे त्यांनी मग त्या वाटसरूलाच 'आता तुम्ही एखादी गोष्ट सांगा' अशी गळ घातली.

"एकच का, चांगल्या पाच गोष्टी सांगतो मी." तो ब्राह्मण वाटसरू उत्तरला, "मात्र त्यासाठी तुम्ही मला पन्नास मोहरा दिल्या पाहिजेत. आहे कबूल?"

"वा: वा: !.... एवढीशी करमणूक करण्यासाठी एवढं मोठं मोल?" ते सगळेजण जवळजवळ एकदम नापसंती व्यक्त करीत म्हणाले.

पण तो वाटसरू काही आपला हेका सोडीना. तेव्हा मग ते चौघे मित्र आपापसात ठरवून त्याला म्हणाले, "हे पाहा, आम्ही आहोत चौघेजण. तेव्हा प्रत्येकी दहा-दहा अशा चाळीस मोहरा आम्ही देतो तुला. एवढं मोल काही कमी नाही खास."

चाळीस मोहरा काही कमी नाहीत, असा पोक्त विचार करून त्या सौद्याला तो ब्राह्मण कबूल झाला. पण त्या मोहरा त्याने आगाऊ घेतल्या. मग घसा खाकरून तो म्हणाला,

"माझ्या ह्या गोष्टी खरं म्हणजे गोष्टी अशा नाहीत. पण तुमच्या आयुष्यात तुम्हाला मार्गदर्शक ठरतील असे बहुमोलाचे सिद्धान्त आहेत. सुवर्णवचनं आहेत एक एक महाराजा. बरं, ऐका.

"मित्रांनो, पैशाचा उपयोग प्रवासासाठी करायचा असतो. हा पहिला सिद्धान्त.

"खरा मित्र तुमच्या आपद्प्रसंगी तुमच्या उपयोगी पडल्याशिवाय राहाणार नाही.

"आपद् प्रसंगी कुणा सग्यासोयऱ्याचा आधार घेऊ नका.

"बायको जोवर नवऱ्यापाशी असते, तोवरच तिच्या एकनिष्ठेबद्दल विश्वास बाळगावा.

"आणि माझा शेवटचा सिद्धान्त हा आहे की—

"जो झोपेवर विजय मिळवील तोच सम्राट विक्रमादित्याच्या राजकन्येचे पाणिग्रहण करू शकेल.

"बस्स एवढंच. झालं माझं सांगून. आता देव करो नि तुमचा प्रवास सुखाचा होवो!"

पण गोष्टींच्या नावाखाली ते पाच तुटपुंजे सिद्धान्त सांगून त्याने वेळ मारून नेलेली त्या चौघांना खपली नाही. त्यांनी त्या वाटसरूभोवती एकच गिल्ला केला. "तू आमची पार फसवणूक केलीस," असे म्हणून ते अस्तन्या सरसावून त्याला मारायला धावले. म्हणाले, "ह्या काय गोष्टी झाल्या? हुं:....भुक्कड नाही तर!...."

पण तो वाटसरू निश्चल राहिला होता. शेवटी त्या चौघा-मित्रांनी हातघाईवर न येण्याचा पोक्त विचार केला. खूप आरडाओरडा मात्र केला; आणि अखेर त्यांनी त्याला राजाच्या न्यायासनापुढे खेचले.

त्या ब्राह्मण वाटसरूविरुद्ध त्या चौघाजणांनी दातओठ खात केलेला फसवणुकीचा आरोप राजाने शांतपणे ऐकून घेतला. 'हा काही विलक्षणच प्रकार आहे!'....तो आपल्याशीच म्हणाला. मग त्या वाटसरूला त्याने विचारले, "बरं! .. . ब्राह्मणमहाशय,तुमचं काय म्हणणं आहे?"

"महाराज,' तो वाटसरू शांतपणे म्हणाला, "मी ह्या लोकांना आयुष्यात उपयोगी पडतील असे बहुमोलाचे पाच सिद्धान्त दिले आहेत. खरं म्हणजे, ह्यांनी त्याबद्दल मला दिलेल्या चाळीस मोहरांचे मोल त्यामानानं काहीच नाही. महाराज, आपल्या कानांवर ते सिद्धान्त पडले, तर आपणहि माझं म्हणणं मान्य कराल. पण आपण ह्या पाच सिद्धान्तांसाठी मला पाचशे मोहरा दिल्या पाहिजेत."

राजाचे कुतूहल वाढले. क्षणभर विचार करून, तिजोरीतून पाचशे मोहरा त्याला देण्याचा हुकूम राजाने केला. तेव्हा मग ब्राह्मणाने ते पाचहि सिद्धान्त शांतपणे राजाला ऐकवले, आणि तो गप्प राहिला.

प्रथम राजाला हा मूर्खपणाचा प्रकार वाटला. मग थोड्याशा विचाराअंती ते सिद्धान्त चिंतनीय असल्याचे त्याच्या लक्षात आले. ह्या सिद्धान्तांची प्रचीती घेऊन पाहिली तर? असा विचार त्याच्या मनात आला. एवीतेवी ह्या सल्ल्यासाठी एवढे मोल तर दिले आहे....

म्हणून एके दिवशी सकाळीच राजाने आपल्या राणीला तिच्या माहेरी धाडून दिले. नंतर, आपण कसल्या तरी गुप्त कामगिरीवर थोडे दिवस जात असल्याचे त्याने जाहीर केले, आणि रातोरात गोसाव्याच्या वेशात तो राजवाड्यातून गुपचूप बाहेर पडला. आपल्याबरोबर त्याने फक्त सात रत्नमणी तेवढे लपवून घेतले.

कित्येक दिवसांच्या कंटाळवाण्या, त्रासदायक प्रवासाअंती राजा आपल्या बहिणीच्या दारापाशी अन्न व निवाऱ्यासाठी गेला. ही त्याची बहीण शेजारच्या राज्याची राणी होती. फाटकेतुटके कपडे घातलेला, नि धूळ माखलेला, भिकाऱ्यासारखा आलेला आपला हा भाऊ पाहून ती चकित झाली. पण तिला काही त्याची दया आली नाही. लढाईत आपला पराभव झाला व आपण अशाप्रकारे देशोधडीला लागलो असल्याचे त्याने सांगितले. पण तिच्यासारख्या राणीला असला हा 'भिकारडा' भाऊ शोभण्यासारखा नव्हता. त्याची शरम वाटून ती दूर झाली नि म्हणाली,

"तुला अशा स्थितीत कुणी इथं पाहिलं तर माझी उगाच नाचक्की होईल. तेव्हा तू आपला इथून निघून जा कसा."

"प्रत्यक्ष बहीण असून किती निष्ठुर होतेस ग ? " तो 'भिकारी' राजा तिची दया भाकीत म्हणाला, "पण मी इथं राहून तुला काळिमा आणणार नाही. मला फार भूक लागलीय्. काही खायला दे. मग मी लगेच निघून जातो. खूप थकलोय मी. आणि जेवणाची थाळी पाठवशील ना, त्यावर तुझी आठवण म्हणून तुझं नाव तेवढं घातलेलं असू दे."

आपले नाव असलेल्या थाळीत त्या बड्या बहिणीने शेवटी आपल्या भावाला कसले तरी जेवण पाठवून दिले नि वेळ मारून नेली. ती स्वतः काही त्याचे तोंड पहाण्यास पुन्हा आली नाही.

त्या 'भिकारड्या' राजाने ती थाळी घेतली नि गुपचूप नेऊन एके ठिकाणी पुरून ठेवली. मग तो पुढच्या मार्गाला लागला

दोन दिवसानंतर भिकाऱ्याच्याच वेशात तो राजा दुसऱ्या गड्यातल्या आपल्या एका जुन्या मित्राच्या घरी जाऊन ठेपला. त्या मित्राने मात्र त्याचे चांगले स्वागत केले. राजाचा भिकारडा वेश वगैरे न पाहता मित्रप्रेमाने त्याने त्याला कडकडून मिठी मारली. मग त्या मित्राने राजाला घरात नेले व चांगले कपडे घालायला दिले; आपल्याबरोबर सुग्रास अन्न जेवायला घातले. एवढेच नव्हे, तर पलंगावर त्याची झोपायची व्यवस्थाहि केली. खऱ्या मित्राची प्रचीती राजाला आली.

दोनच दिवसांपूर्वी प्रत्यक्ष वहिणीने केलेल्या संभावनेमुळे कष्टी झालेला राजा मित्राच्या ह्या प्रेमळ वागणुकीने आनंदित झाला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच राजाने आपल्या मित्राचा निरोप मोठ्या दुःखद अंतःकरणाने घेतला. आपल्याला काहीं एक कामगिरी करायची असून त्यासाठी लौकर पुढच्या मार्गाला लागलें पाहिजे असे सांगून त्याने मित्राची समजूत घातली.

वाट चालता चालता त्या ब्राह्मणाच्या सिद्धान्तांची त्याला पुन्हा आठवण झाली. एकेका सिद्धान्ताचा पडताळा येत गेल्याने त्यांचा खरेपणा त्याला पटू लागला होता.

आता राजाचे पाय, माहेरी गेलेल्या आपल्या राणीकडे, तिच्या बापाकडे वळले. वेश तोच भिकारडा होता. सासऱ्याच्या--राणीच्या बापाच्या वड्या वाड्यातील घोड्यांच्या पागेत त्याने कशीबशी नोकरी मिळवली. पागेचा पागनिस मोठा रुबाबदार गडी दिसत होता. त्याने राजाला नोकरीस ठेवून घेतले आणि आपल्या घराच्या बाजूचीच एक एक खोली त्याला राहायला दिली.

त्या दिवशी रात्रीचीच गोष्ट. त्या रुबाबदार पागनिसाच्या घरात गुपचूप शिरत असलेली एक बाई राजाने आपल्या खोलीच्या खिडकीतून पाहिली राजा दिवा मालवून खिडकीशी विचार करीत बसला होता. तेवढ्यात ती बाई आजूबाजूचा कानोसा घेत चोरटे पणाने त्या पागनिसाच्या घरात शिरताना त्याने पाहिली.

त्याबरोबर त्या राजाचे कुतूहल जागृत झाले. पागनिसाच्या घराच्या बाजूने राजाच्या खोलीच्या भिंतीला एक लहानसा झरोका होता. त्यामधून राजा हळूच पाहू लागला. तो काय, राजा हतबुद्धच झाला. दिव्याच्या लख्ख प्रकाशात, खुद्द त्याची राणी त्या पागनिसाच्या पलंगावर त्याच्या मिठीत पडलेली होती. राजाच्या अंगाचा तिळपापड उडाला. ते दृश्य त्याला सहन होईना.

तडक जाऊन राजाने पागनिसाचे दार ठोठावले. गडबडीने दार उघडण्यास पागनिस गेला. पण त्याला दार उघडू देण्यापूर्वी राणीने हळूच किल्लीच्या भोकातून बाहेर न्याहाळून पाहिले. बाहेर आपला नवरा उभा आहे, ह्याबद्दल तिला बिलकुल शंका उरली नाही. त्याबरोबर तिचा भीतीने थरकाप उडाला. आता तरणोपाय नाही असे तिला वाटले. पण ती मोठी जहांबाज बाई होती. राजाचा ह्यावेळी कायमचा निकाल लावला तरच आपला निभाव लागेल हे तिने ताडले. आणि म्हणून त्याचे डोके उडविण्याची तात्काळ व्यवस्था करण्यास पागनिसाला सांगितले.

पागनिस अर्थातच शब्दाबाहेर नव्हता. त्याने प्रथम दार उघडून राजाला पकडले आणि रातोरात जंगलात नेऊन त्याचे डोके उडविण्यासाठी त्याला मारेकऱ्याकडे सोपविले.

तो मारेकरी व राजा जंगलात दूरवर जाईपर्यंत उजाडू लागले. राजाचे डोके उडविण्यासाठी मारेकरी आपली तलवार उपसणार तोच, राजाने आपल्या जवळचे ते सात रत्नमणी त्याला दाखवले. ते पाहून मारेकरी चमकला. राजा म्हणाला,

"मला तू सोडून देशील तर यापैकी तीन बहुमोल रत्नं तुला मिळतील."

त्या तीन रत्नमण्यांच्या बदली त्या मारेकऱ्याने राजाला तिथल्या तिथे सोडून दिले.

जीवानिशी सुटलेला राजा तसाच पुढल्या प्रवासाला लागला. ब्राह्मणाच्या एकेका सिद्धान्तात खूपच अर्थ भरलेला आहे असे त्याला वाटू लागले. इतर पडताळे येऊन चुकले होतेच; आता सम्राट विक्रमादित्याच्या सुस्वरूप मुलीचे पाणिग्रहण करण्याचे बिकट कार्य तेवढे उरले होते. झोपेवर ताबा मिळवला तर आपण हाहि कठिण कार्यभाग साधू शकू असा आत्मविश्वास त्याला वाटू लागला.

फिरता फिरता शेवटी राजा, सम्राट विक्रमादित्याच्या भव्य दरबारात जाऊन दाखल झाला. ह्यावेळी त्याने भगवी वस्त्रे परिधान केली होती. सम्राट विक्रमादित्याला तो म्हणाला.

"महाराजाधिराज, मी आपल्या सुस्वरूप कन्येला मागणी घालायला आलेलो आहे. तिला मी जिंकले, तर हा संन्यास मी आनंदाने सोडून देणार आहे."

सम्राट विक्रमादित्य गंभीरपणाने म्हणाला,

"योगीराज, आपली तयारी तर मोठी दिसते. पण ही कार्यसिद्धी सोपी नाही, माझ्या कन्येचं पाणिग्रहण करण्याच्या इच्छेनं आलेले कैक धिप्पाड वीर नाहक प्राणास मुकलेले आहेत, ही गोष्ट

आपण लक्षात घ्या. आणि मग पुढचं पाऊल टाका. माझी ना नाही. रात्री तिच्या महालात तुम्हांला सोडण्यात येईल. आणि सकाळपर्यंत तुम्ही जिवंत राहिलात, तर....तर मग राजकन्या तुमचीच आहे. सुदैवानं तसं झालं तर मी मोठ्या आनंदानं आशीर्वाद देईन."

राजाने मनाची तयारी केलीच होती. ब्राह्मणाच्या त्या शेवटच्या सिद्धांताचा पडताळा घेण्याचा त्याचा निश्चय झाला होता. मध्यरात्रीच्या पूर्वीच त्याला राजकन्येच्या महालात सोडण्यात आले. तिच्या नकळत राजा एका बाजूला गुपचूप जाऊन लपून राहिला.

राजकन्या आपल्या पलंगावर खुशाल आरामाने पडली होती. तिचे सौंदर्य पाहून तिच्या स्वरूपाची कीर्ती खरी असल्याचे राजाला पटले. हां हां म्हणता मध्यरात्र उलटली आणि राजकन्येच्या डोळ्यावर झोप आली; आणि काय आश्चर्य! ती राजकन्या झोपी गेली, पण तिने दिलेल्या त्या जांभईबरोबर तिच्या तोंडावाटे एक भयंकर विषारी नाग हळूच बाहेर आला.

ब्राह्मणाने सांगितलेल्या सिद्धान्ताप्रमाणे राजा झोपी न जाता काळोख्या कोपऱ्यात जागता पहारा करीत उभा राहिला होता. तो काळसर्प पाहिल्याबरोबर प्रथम राजा भीतीने गारठलाच. पण क्षणभरात स्वतःला सावरीत त्याने आपल्याकडची तलवार बाहेर काढली आणि पुढे सरसावून तत्काळ त्या नागावर लागोपाठ वार केले.

नाग ठार झाल्याचे पाहून राजाने सुटकेचा निःश्वास सोडला. तोवर पहाट झाली. राजकन्येच्या महालात रात्री गेलेला 'संन्यासी'

अपेक्षेप्रमाणे मरून पडला असेल म्हणून त्याचे प्रेत नेण्यासाठी सम्राट विक्रमादित्याचे पहारेकरी तेथे आले.



पण तो संन्यासी जिवंत असल्याचे पाहून त्यांचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. त्यांनी डोळे चोळचोळून पाहिले. पण छे !.. .तो चांगला जिवंत होता ! पहारेकऱ्यांनी ही अद्‌भुत गोष्ट तत्काळ सम्राटाच्या कानावर घातली. तोहि अचंबा करीत हा चमत्कार पाहण्यासाठी आला. आपली कन्या शेवटी शापातून मुक्त झालेली दिसते हे त्याने ओळखले. राजाने—त्या 'संन्याशा' ने सांगितलेली ती काळसर्पाची कथा ऐकून तो थक्कच झाला. पण काही का असेना. तो काळसर्प आता ठार होऊन आपली कन्या शापमुक्त झाली हे पाहून तो आनंदित झाला. 'संन्याशा' ला त्याने प्रेमभराने मिठी मारली

आता लग्नसोहळा उरकण्याचेच काय ते बाकी उरले. विक्रमादित्याने तयारीहि चालविली. पण संन्यासी म्हणाला,

"थोडं थांबा. मला दोनचार महत्त्वाची कामं उरकायची आहेत. ती पुरी करून येतो; मग लग्नसोहळा."

—आणि सम्राटाचा व राजकन्येचा निरोप घेऊन राजा तिथून निघाला. निघण्यापूर्वी राजकन्येला आपली खुणेची आंगठी द्यायला मात्र तो विसरला नाही.

बस्स्! ....राजाची संकल्पसिद्धी झाली होती. ब्राह्मणाच्या सिद्धान्ताची प्रचीती त्याला पुरेपूर आली होती. आता त्याला सरळ आपली स्वतःची राजधानी गाठायची होती. त्याप्रमाणे तो लौकरच तिथे जाऊन पोचला.

त्यानंतर त्याने पहिली गोष्ट करायची ठरविली ती ही, की राजेशाही थाटात आपल्या त्या वहिणीची भेट घ्यायची. मोठ्या लवाजम्यानिशी तो वहिणीच्या राज्यात गेला. ह्यावेळी त्या वहिणीने मोठ्या थाटाने त्याचे स्वागत केले. परंतु, मागल्या खेपेला तिने आपली कशी बोळवण केली होती ह्याची तिला आठवण देण्यासाठी, त्याने त्यावेळी पुरून ठेवलेली जेवणाची थाळी उकरून काढायला लावली व तिला दाखवली.

त्याच्या त्या वहिणीने शरमेने मान खाली घातली; आणि त्याचे पाय धरून क्षमा मागितली.

०९६२०.०२ अ.क्र. ३४७४ ३४३६ ३०।३।७९

तिथून राजा गेला आपल्या त्या मित्राकडे. आपल्या राज-मित्राला 'पुन्हा राज्य प्राप्त झाल्याचे' पाहून त्या मित्राला मोठे समाधान वाटले. राजानेहि त्याला आपला सरदार बनवून त्याचा बहुमान केला.

त्यानंतर राजा खुद्द आपल्या राणीच्या माहेरी जाऊन दाखल झाला. तिच्या बापाची भेट घेऊन तिच्या पापकर्माची कहाणी राजाने त्याला सांगितली. साक्षीसाठी त्याने त्या मारेकऱ्याहि बोलावून घेतले. हा सर्व प्रकार ऐकून राणीचा बाप हतबुद्धच झाला. त्याने तत्काळ आपल्या कन्येला आणि पागनिसाला बेड्या ठोकल्या आणि एका तळघरात बंदीत टाकले.

आणि मग आपल्या लवाजम्यानिशी राजेशाही थाटात राजा शेवटी सम्राट विक्रमादित्याच्या राजधानीत जाऊन दाखल झाला. आपल्या कन्येचा भावी पती संन्यासी नसून प्रत्यक्ष राजाच असल्याचे पाहून विक्रमादित्य हर्षभरित झाला. राजकन्येच्याहि आनंदाला पारावार राहिला नाही लग्नसोहळा तर इतक्या अभूतपूर्व उत्साहाने साजरा झाला की सांगून सोय नाही.

त्या ब्राह्मणाने सांगितलेल्या सिद्धान्तांची प्रचीती आणून देणारी ही कहाणी इथे संपली हे खरे; पण त्या चाणाक्ष व चतुर ब्राह्मणाचा विसर त्या राजाला अर्थातच पडला नव्हता. राजाच्या सांगण्यावरून विक्रमादित्याच्या दरबारात त्याला बोलावून घेण्यात आले आणि त्याचा आदरसत्कार करून सन्मानाने त्याला भरपूर द्रव्य अर्पण करण्यात आले.

●●●

# चतुर निवड

फार पूर्वीची गोष्ट आहे. काश्मीरचा एक राजकुमार काही केल्या लग्न करायला कबूल नव्हता. राजा आता म्हातारा होऊ लागला होता म्हणून एके दिवशी त्याने कुमाराला बोलावून घेतले. तो म्हणाला,

" बेटा, मी आता थकलो. तुझं लग्न झालेलं पाहण्याची तेव्हढी माझी इच्छा आहे. म्हणून म्हणतो एकदाचं लग्न उरकून घे पाहू ."

कुमार म्हणाला, " पण बाबा, माझ्या पसंतीची मुलगी भेटली नाही अजून मला. मग मी काय करू ? "

यावर राजा त्याला बजावून म्हणाला, " हे पहा तुला आवडेल ती मुलगी निवड तू. माझी हरकत नाही. पण होईल तेव्हढ्या लौकर तू लग्न हे केलंच पाहिजेस. आता माझ्यामागं तू राज्य करशील. पण तुझ्यामागं वारस ठेवला नाहीस, तर राज्याचं कसं व्हायचं ? तुला हवी ती बायको शोधायला सहा महिने देतो मी. तेवढ्या मुदतीत ती सापडली नाही, तर मात्र मी सांगेन त्या मुलीशी तुला लग्न लावावं लागेल. नाही तर माझं राज्य तुला सोडावं लागेल."

हे ऐकून कुमारला अतिशय वाईट वाटले. पण बापाची–राजाची–आज्ञा पाळणे भाग होते म्हणून तो वेष बदलून राजवाड्यातून निघाला. बायकोच्या शोधात गावोगाव हिंडू लागला.

प्रवासात राजकुमाराला कितीतरी सुंदर मुली भेटल्या. पण बायको करायला एकसुद्धा लायक वाटली नाही त्याला.

दिवसांमागून दिवस गेले. महिन्यांमागून महिनेहि उलटू लागले पण पसंतीला उतरणारी एकहि मुलगी कुमाराला भेटेना. सुंदर खरी, पण चांगली व्यवहारचतुर बायको हवी होती त्याला.

हळूहळू आपल्याला हवी तशी बायको मिळण्याची आशा सोडून कुमार दूरदूर भटकू लागला. करता करता सहा महिन्यांची मुदत भरायला आली. आता काय करणार? एक तर बाबा सांगतील त्या मुलीशी मुकाट्याने लग्न करायचे, नाहीतर राज्यावरील हक्क सोडायचा! कुमारचा काहीच निश्चय होईना.

इतक्यात एके दिवशी भटकता भटकता कुमारला एक शेतकरी भेटला. एकटेच चालण्यापेक्षा त्या शेतकऱ्याबरोबर गप्पा मारीत जावे असे त्याला वाटले. म्हणून त्या शेतकऱ्याच्या सोबतीने कुमार वाटचाल करू लागला.

थोडे अंतर गेल्यावर कुमार त्या शेतकऱ्याला म्हणाला, "वाटेत आपण एकमेकांचा भार वाहिला तर तेवढच बरं होईल, नाही का? आपला प्रवास त्यामुळं बराचसा सुसह्य होईल."

शेतकऱ्याला कुमारच्या बोलण्याचा अर्थ नीटसा समजला नाही. त्याला वाटले की वेडगळ दिसतेय स्वारी!

चालता चालता थोड्या वेळाने त्यांना एक शेत लागले. कुमारने प्रश्न केला, "हे शेत कुणीतरी खाऊन टाकले तर नाही?"

शेतकऱ्याला अचंबा वाटला. पीक भर जोमात आहे, सबंध मळा भरला आहे; आणि असे असून हा बेटा असा विचित्र प्रश्न विचारतोय्. कुमाराच्या मूर्खपणाबद्दल त्याची खात्री पटू लागली. त्या प्रश्नाचं काहीहि उत्तर न देता तो वाट चालू लागला.

थोड्या वेळाने ते एका रानात येऊन पोचले. आपल्याकडचा चाकू त्या शेतकऱ्याला देत कुमार म्हणाला, "हा घे नि दोन मजबूत घोडे मिळतात का पहा बघू. आपल्याला प्रवासात उपयोगी पडतील."

आता मात्र तो शेतकरी संतापला आणि गरजून म्हणाला, "हे पहा. नसती चेष्टा माझ्याकडे नको. चाकू देऊन घोडे मिळतात का? नि तेहि या रानात? ऐकलेय् तरी का कुणी?"

कुमार काही बोलला नाही. हसून गप्प राहिला. पुढची वाट मसणवटीजवळून गेली होती. मेलेल्यांच्या नावाने काही लोक वाट-सरूंना अन्नदान करीत होते. ते पाहून कुमार म्हणाला, "वा! चांगली नगरी दिसते की!"

शेतकऱ्याने त्याच्या वेडगळ बोलण्याकडे लक्षच दिले नाही.

लौकरच ते एका मोठ्या शहरात येऊन ठेपले. पण जो तो आपल्या कामात, धावपळीत. त्यांना कुणी अन्नपाणी देईल तर शपथ. कुमार म्हणाला,"भली मोठी मसणवटच दिसते आहे ही!"

म्हाताऱ्या शेतकऱ्याची आता मात्र खात्रीच पटली की कुमार वेडा असला पाहिजे. म्हाताऱ्याला त्याची दया आली. आपले गाव आले तसा तो कुमारला आपल्या घरी बोलावू लागला. कुमार म्हणाला,

'आभारी आहे मी तुझा शेतकरीदादा. पण तुझ्या घराचं छप्पर चांगलं मजबूत आहे ना?'

'चल रे तू. त्याची नको तुला काळजी. नसती उठाठेव करू नकोस, चल.'

आणि शेतकरी मग त्याला आपल्या घरी घेऊन गेला. त्याची तरुण मुलगी नि बायको स्वागत करायला दारात आल्या. पाहुण्याला ओटीवर बसायला सांगून शेतकरी बायकोमुलीसह आत गेला आणि म्हणाला, "हा पाव्हणा आणलाय ना—तो मोठा चमत्कारिक माणूस आहे. चागला देखणा दिसतोय्, पण आहे वेडगळ. घरी बोलवले तर म्हणे—'तुझ्या घराचं छप्पर चांगलं मजबूत आहे ना? आता ह्याच्यापुढं काय बोलणार कपाळ? याच्या डोक्यावर कोसळून का पडणार ते?"

एव्हढे बोलून तो शेतकरी मोठ्यांदा हसू लागला. पण त्याची मुलगी शहाणी होती. ती म्हणाली,

"बावा, वेड्यात काढू नका त्याला तुम्ही. त्याला पाहुणचार देण्याची तुमची ऐपत आहे की नाही याची माहिती हवी असेल त्याला."



"तसेहि असेल कदाचित्." शेतकरी म्हणाला,"पण आणखी काही गमतीच्या गोष्टीहि बोलला तो."

"ऐकू या तर खरं काय काय म्हणाला ते?" मुलगी म्हणाली.

"तू खरोखरीच भारी चलाख आहेस ग." शेतकरी म्हणाला, "पण मला सांग–प्रवासात कुणाकडेच काहीही सामान नसताना आपण एकमेकांचा भार वाहू या, असं तो बोलला. याचा अर्थ काय?"

"तुम्ही एकमेकांना गोष्टी सांगून किंवा गप्पा मारून मनोरंजन करीत वेळ घालवावा, असा त्याचा मतलब असावा, बाबा."

तो कुमार जे जे विचित्र बोलला, ते ते सर्व मग त्या शेतकऱ्याने आपल्या मुलीला सांगितले. ते ऐकून ती म्हणाली,

'बाबा, खरोखरीच चांगला शहाणा माणूस दिसतो तो. शेतकऱ्याला जर कर्ज असलं आणि ते त्यानं गहाण टाकलं असलं तर त्या शेतातलं उभंच्या उभं पीक आधीच खाऊन टाकल्यासारखं आहे. कारण ते पीक त्याचा सावकार उपटणार. वाटचालीत थकलेल्याला चांगली मजबूत काठी टेकायला उपयोगी पडते. एक प्रकारे घोड्यासारखीच सोयीची ठरते. म्हणून चाकूनं तुम्हा दोघांसाठी दोन काठ्या कापून आणायला त्यानं सांगितलं असावं'.

'आणि ती मसणवटीची गोष्ट?' शेतकऱ्याने विचारले.

"त्या मोठाल्या शहरात तुम्हांला कुणीच काही खायला दिलं नाही. अर्थात ते मसणवटीसारखंच निरुपयोगी नाही का? तर उलट, ज्या मसणवटीत अन्नदान करीत होते ती एखाद्या नगरीसारखी सोय पुरवणारी ठरली. पाहुणचाराला ठेवून घ्या त्याला बाबा! म्हणावं, आमच्या घराचं छप्पर चांगलं मजबूत आहे."

मग काय! कुमारला मोठा प्रेमळ पाहुणचार मिळाला. तो राजकुमार होता हे कुणालाच माहिती नव्हते. वेष बदलला असल्याने तोहि साधाच होता. शेतकऱ्याला विचित्र वाटणाऱ्या आपल्या म्हणण्याचा अर्थ त्याच्या मुलीने बरोबर लावला हे कुमारला त्याच्याकडून कळले एवढेच नाही, तर बोलण्याचालण्यातली तिची चतुराईहि त्याला दिसून आली. मुलगी खूप सुंदर नसली तरी साधारण देखणी व चलाख होती.

कुमारला वाटले,'माझ्या मागचा भटकंतीचा फेरा सुटतोयसं दिसतं. कारण माझ्या पसंतीची मुलगी तर सापडली. बाबांनाहि आनंद होईल.'

मग त्याने आपली कथा त्या शेतकऱ्याला सांगितली नि मुलीशी लग्न करायची इच्छा बोलून दाखविली.

शेतकऱ्याचा, त्याच्या बायकोचा नि मुलीचा आनंद काय विचारता ?

झालं! लग्न ठरलं! कुमार सर्व मित्रमंडळीसह परत फिरला. त्याची चतुर बायको पाहून राजालाहि आनंद झाला. लग्नसोहळा मोठ्या थाटात पार पडला.

# ठकसेन राजकुमार

जुन्या काळची गोष्ट. एकदा काश्मीरचा राजा शिकारीसाठी एकटाच जंगलात गेला होता. बराच वेळ हिंडला, पण त्याला शिकारच कुठे दिसेना. अशीच दुपार टळून गेली. शेवटी एकदाचे त्याला एक सुंदर हरीण दूरवर दिसले. घोड्याला पिटाळीत त्याने त्या हरणाचा पाठलाग चालवला. पण दिवस मावळत आला, तरी ते हरीण काही त्याच्या तावडीत सापडेना. शेवटी त्याने त्या हरणाचा नाद सोडून दिला. पण तोवर तो आपल्या राजधानीतून खूप दूरवर जंगलाच्या दुसऱ्या टोकाला येऊन पोचला होता.

थकल्या-भागल्या राजाने बाजूला नजर फेकली. तो जवळच एक मोठी बाग त्याला दिसली. सुंदर सुंदर फुलांनी बहरली होती ती. त्या बागेत जरा विश्रांती घ्यावी असा बेत करून राजा जवळ गेला. तो तिथे राजकन्येसारखी एक रूपवान तरुणी फेरफटका मारीत असलेली त्याला दिसली. ती एकटीच होती. तिच्या जवळ तरी दुसरे कुणी दिसत नव्हते.

'ही तर राजकुमारी दिसते' राजा स्वतःशीच पुटपुटला. 'पण मोठी घमेंडी आणि उद्धट दिसतेय् चेहऱ्यावरून.'

आणि खरोखरच ती तरुणी आपल्याच नादात होती. राजाकडे तिने ढुंकूनहि पाहिले नाही. तिच्या या बेपर्वाईच्या वागणुकीमुळे राजाचा अहंकार दुखावला गेला. जराशा हलक्या पण तिला ऐकू जाईल अशा आवाजात तो पुटपुटला—' कुणी तरी राजपुत्राने हिच्याशी लग्न करावे आणि मग याच बागेत हिला टाकून द्यावे!'

ती तरुणी राजकन्याच होती. राजाचे ते विचित्र उद्गार ऐकून तुच्छतेने मान उडवीत ती म्हणाली— ' मलाहि असं वाटतं की कुणीतरी तरुणीनं तुमच्याशी लग्न करावं आणि तुमच्यापासून तिला जो मुलगा होईल त्याने तुमच्या मुलीशी लग्न करावे!'

आणि हे रोखठोक उत्तर देऊन ती बेधडक निघून गेली.

अर्थातच हे उत्तर राजाला झोंबले. तरीपण तिच्या रूपाला तो भुलला होता. ' काय वाटेल ते झाले तरी हिच्याशी लग्न केले पाहिजे,' असे मनाशी ठरवीत राजा परत आपल्या राजवाड्याकडे वळला.

दुसऱ्या दिवशी सकाळीच राजाने आपल्या प्रधानाला बोलावून घेतले आणि फर्मावले, ' शेजारच्या राज्याच्या राजाला ताबडतोब भेटा आणि त्याच्या राजकन्येला माझ्यासाठी मागणी घाला.'

काश्मीरसारख्या वड्या राज्याचा राजा आपल्या कन्येसाठी मागणी घालीत आहे हे पाहून शेजारच्या त्या छोट्याशा राज्याच्या राजाला धन्यता वाटली. त्याने तत्काल संमती दिली.

आठवड्याभरातच काश्मीरचा राजा मोठ्या लवाजम्यासह शेजारच्या राज्यात गेला; आणि त्या राजकन्येशी विवाह करून तिच्यासह डामडौलाने परत आला. लग्नानिमित्त राजधानीत मोठा समारंभ साजरा झाला. मेजवान्या, गाण्याच्या मैफली, दानधर्म साऱ्या गोष्टी राजाला साजेशा इतमामाने झाल्या. सगळीकडे खुषीचे वाता-वरण पसरले. दुःखी जीव एकटाच होता आणि तो म्हणजे नववधू—राजाची नवी राणी बनून आलेली ती राजकुमारी.

कारण, लग्न झाल्यानंतर राजाने तिला अगदी एकटे ठेवले होते. चुकूनहि तिची भेट तो घेत नव्हता.

'मी असं कोणत पाप केलं आहे म्हणून मला ही शिक्षा?' असे उद्गार काढीत ती राजकन्या आसवे ढाळीत असे. परंतु एकदा अचानक या कोड्याचा तिला उलगडा झाला. आपल्या बागेत राजाशी झालेल्या पहिल्या भेटीची तिला आठवण झाली. राजाचे ते उद्गार आणि आपण दिलेले रोखठोक उत्तर तिला आठवले. त्यावेळचा राजाने सूड उगवायचा ठरवलेला दिसतो. ती जेवढी अभिमानी होती तेवढीच धीराचीहि होती.

'त्या वेळचा तो प्रकार नाहीतरी मूर्खपणाचाच झाला,' ती स्वतःशीच म्हणाली. 'तरीपण राजा जर त्यावेळचे आपले धमका-वणीचे उद्गार खरे करून दाखवीत असेल, तर मग मलाहि माझे शब्द आचरणात आणावे लागतील!'

आणि लग्नाला दोनएक महिने झाले तशी राजाची परवानगी घेऊन ती माहेरी म्हणून निघाली. राजाला ह्या गोष्टीचा आनंदच

झाला. 'पहिल्या भेटीत माझ्याशी उद्धटपणे वागल्याबद्दल तिला आता चांगलीच अद्दल घडेल!' तो स्वतःशीच म्हणाला. आपण निष्ठुरपणे वागत आहोत, हा विचारहि त्याला शिवला नाही. केवळ क्षणिक अपमानाचा सूड तो घेत होता.

राजकन्येने काही महिने आपल्या माहेरी काढले. त्यानंतर काही एक मसलत ठरवून ती प्रवासाला म्हणून बाहेर पडली.

त्यावेळी काश्मीरचा राजा आपल्या राज्यातील दूरवरच्या एके ठिकाणी विश्रांतीसाठी छावणी ठोकून राहिला होता. एके दिवशी संध्याकाळी राजाकडे निरोप आला, की बुरखा घेतलेली कुणी तरुणी त्याला भेटू इच्छीत आहे. ती अतिशय सुंदर आहे. पण स्वतःचे नाव मात्र सांगत नाही. राजाला या गोष्टीचे मोठे कुतूहल वाटले. त्याने लगेच तिला भेटीला बोलावून घेतले.

आणि दिव्याच्या प्रकाशात तिचे रूप पाहून तिच्यावर तो मोहित झाला. आपल्या छावणीत त्याने तिला ठेवून घेतले; एवढेच नव्हे तर तिच्या सांगण्याप्रमाणे तिच्या अर्ध्या वचनात तो राहू लागला. त्यामुळे, केवळ रात्रीच्या वेळीच त्याने आपल्या सहवासात राहावे ही तिची अट तो विनतक्रार पाळू लागला. अशाप्रकारे जवळ जवळ महिनाभर दोघेहि एकत्र राहिली. वेषांतर केलेली तरुणी दुसरीतिसरी कुणी नसून राजाची नवी राणीच होती. परंतु केवळ रात्रीच तिचे दर्शन घेणाऱ्या राजाला तिची ओळख काही पटली नव्हती. एके दिवशी रात्री तिने राजाला सांगितले की आपणाला

आता परत आपल्या गावी जाणे भाग आहे. राजाचा अर्थातच नाइलाज झाला. तरीपण प्रेमाच्या सहवासाची आठवण म्हणून उभयतांनी एकमेकांच्या आंगठ्यांची अदलाबदल केली. राजाच्या इच्छेप्रमाणे कधीतरी राजवाड्यात भेटण्याचे तिने वचन दिले आणि ती निघून गेली.

तिथून ती राजकुमारी परत आपल्या माहेरी गेली. आणि काही दिवसांनी तिथे तिला मुलगा झाला. त्याचे नाव तिने ठेवले शबरंग.

छोटा शबरंग हळूहळू वाढत मोठा झाला. देखणाहि दिसू लागला. अभ्यासात व खेळात तो आपल्या सवंगड्यांवर मात करी. परंतु त्याच्या बाबतीत त्याच्या आईचे वेगळेच बेत चालले होते. त्याने अत्यंत बिलंदर ठकसेन व्हावे अशी तिची इच्छा होती. म्हणून, चौर्यकलेत पारंगत असलेल्यांना बोलावून घेऊन आपल्या मुलाला तिने चौर्यकलेचे शिक्षण देवबले. पोरसवदा शबरंगला ती एक गंमतच वाटली. या वयात भलेबुरे त्याला कुठे नीटसे कळत होते? लौकरच तो चौर्यकलेत चांगला प्रवीण झाला. कुणालाहि हातोहात फसवून बेमालूम चोऱ्या करू लागला.

एकदा त्याच्या हातचलाखीची परीक्षा पाहण्याचे त्याच्या आईने ठरविले. आणि म्हणून त्याला घेऊन ती एका उंच पहाडापाशी गेली. त्या पहाडाच्या टोकाशी एका कडेकपारीत एक ढोल होती आणि तीत गरुडाच्या एका मादीने अंडी घातली होती. त्यावेळी गरुडाची मादी ढोलीच्याच एका कडेशी बसली होती. तिकडे बोट दाखवीत आई शबरंगला म्हणाली, 'हे पहा बाळ, गरुडाच्या त्या मादीला दाद लागू

न देता त्या ढोलीतलं एक अंडं गुपचूप घेऊन ये. पाहू तुझी करामत.'

तिचे बोलणे सपले नाही तोच शबरंग स्वारीच्या चपळाईने, श्वासाचासुद्धा बिलकूल आवाज होऊ न देता सावलीसारखा पहाड चढू लागला. थोड्याच वेळात त्याने ढोलीपर्यंत मजलहि मारली. गरुडाची मादी निळ्या आकाशाकडे नजर लावून बसली होती. तेवढ्यात हलक्या हाताने हळूच एक अंडे हस्तगत करून शबरंग बिनबोभाट मागे परतलासुद्धा.

त्याची ही चपळाई व कसब पाहून आई खूष झाली. अभिमानाने तिने त्याला पोटाशी घेतले व शाबासकी दिली. यावेळी तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. प्रथमच आपल्या मुलाला विश्वासात घेऊन ती म्हणाली– 'बाळ, आता तुला सांगते. काश्मीरच्या राजाचा बेटा आहेस तू. आता तू चांगला तयार झाला आहेस. खुशाल राजाकडे जा आणि ओळख न दाखवता राजाकडे नोकरी मिळव. चातुर्यानं वागून राजाची मर्जी संपादन कर. तू कोणाचा मुलगा याची मात्र जरासुद्धा कल्पना येऊ देऊ नको. आणि तुझ्या कर्तबगारीवर खूष होऊन त्याने तुला आपल्या मुलीशी लग्न करण्याबद्दल विचारलं, तर सांग की आईची समंती घ्यावी लागेल. मग मला बोलावून घे.'

आणि मग राजकुमार शबरंग आपल्या बापाकडे–काश्मीरच्या राजाकडे गेला. देखणा, आकर्षक चेहरा व चतुराईचे बोलणे यामुळे राजाच्या परिवारात नोकरी मिळवणे त्याला जड गेले नाही. आपल्या चतुराईच्या वागणुकीमुळे लौकरच त्याने राजाचे लक्ष आपल्याकडे

वेधून घेतले. आणि मग हळूहळू राजाची खास मर्जी त्याने संपादन केली. तो बरोबर असल्याखेरीज राजाला चैन पडेनाशी झाली.

परंतु राजकुमार शबरंग हिकमतीने दुहेरी जीवन कंठीत होता. शिकवण्यात आलेल्या चौर्यकलेचा उपयोग केल्याशिवाय त्याला स्वस्थ बसवेना. म्हणून रात्रीच्या काळोखात, सारी नगरी गाढ झोपी गेलेली असताना तो हलक्या पावलांनी गुपचूप बाहेर पडे. बड्या श्रीमंत लोकांच्या वाड्यात शिताफीने शिरकाव करून घेई, आणि तिथल्या तिजोरीतली मालमत्ता अत्यंत कौशल्याने पळवून नेई. कुलपे वगैरे उघडून आपले कार्य तो बेमालूम साधत असे. नगरीतल्या गस्तवाल्यांना तर तो हां हां म्हणता चकवून गुंगारा देई.

शबरंगच्या चोऱ्या वाढत गेल्या तसा साहजिकच बोभाटा होऊ लागला. गुन्हेगार कोण याचा मात्र कुणालाच थांगपत्ता लागत नव्हता. अशी बेमालूम चोरी आजपर्यंत कुणी केली नव्हती असे सर्वजण बोलू लागले. राजाच्या दरबारात लोक रडत रडत येऊन तक्रारी करू लागले. संरक्षणासाठी नीट बंदोबस्त करावा अशी जोराची मागणी होऊ लागली 'या गुन्हेगारावर करडी पाळत ठेवून रक्षकांनी त्याला लौकर पकडले तरच निभाव लागेल. नाहीतर आम्हांला आमचं सर्वस्व गमवावं लागेल!' अशी दीनवाणी गाऱ्हाणी राजापुढे येऊ लागली.

राजाहि गोंधळात पडला. त्याने कोतवालाला बोलावून घेऊन खरमरीत ताकीद दिली—'गुन्हेगाराला लौकर पकडा. नाही तर तुम्हांला

वडतर्फ करण्यात येईल. तुमची नोकरी तर जाईलच पण शिवाय तुम्हांलाच शिक्षा होईल.'

आता कोतवालाने स्वतः जातीने रात्रीच्या काळोखात जागरूकपणे नगरीभर संचार सुरू केला. गल्लीबोळातनहि तो बारकाईने टेहळणी करू लागला. कोणाहि चोराला आपल्याला चकवता येणार नाही या घमेंडीत मिशीला पीळ देत, हलकेच शीळ घालीत स्वारी हिंडायची. जरासा कुठे संशय आला तरी एखाद्याला तो हटकीत असे.

त्या दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास एका बोळातन कुणाची तरी सावली सरकत गेलेली त्याने पाहिली. म्हणून त्याने पाटलाग सुरू केला. आणि लौकरच त्या माणसाला त्याने गाठलेहि. पाहिले तो ती व्यक्ती कुणीतरी तरुणी होती.

'हां! मध्यरात्रीच्या या भयाण वेळी चाललीस कुठं तू?' कोतवालाने सवाल केला.

ती तरुणी घाबरलेली दिसत होती. ती चाचरतच म्हणाली, 'अं....अं....तो चोर.... तुम्ही ज्याच्या पाळतीवर आहात तो चोर जवळच कुठंतरी आलेला दिसतोय बघा. त्याची चोरटी पावलं ऐकली म्हणून पळत जात होते मी. एवढ्यात इकडे येईलसुद्धा तो. अग आई ग....! भारी भीती वाटते बाई मला!'

'काही घाबरू नकोस. मी प्रत्यक्ष कोतवाल इथं असताना कसली आलीय् त्या चोरट्याची भीती?' मिशीला ऐटीत पीळ देत कोतवाल-

साहेब बोलले, 'मला वाटतं त्या बदमाशाला हिकमतीनं पकडण्यासाठी काहीतरी सापळा रचावा!'

त्याच्या बेताला टेकू देत ती तरुणी म्हणाली, "तुमची हरकत नसेल कोतवालसाहेब, तर मी एक हिकमत सुचवते बघा. वेष पालटून इथं कुठंतरी राहा....! नाहीतर असं करा ना– आपण एकमेकांच्या कपड्यांची अदलाबदल करूया! हो....! माझे बायकी कपडे घालून तुम्ही पलीकडल्या त्या विहिरीपाशी उभे राहा नि पाणी काढताय् असं भासवा. आहे की नामी कल्पना?'

कोतवालाला ही कल्पना लगेच पसंत पडली. 'मुलगी मोठी चतुर दिसते' असे आपल्याशीच म्हणत त्याने आडबाजूला जाऊन तिची साडी घेऊन गुंडाळली आणि स्वारी विहिरीपाशी गेली.

परंतु त्याच्यासाठीच हा सापळा रचला होता याची त्याला काय कल्पना? अंधुक प्रकाशात, दोर घेऊन तो पाणी काढू लागला. तोच तो दोर तुटला व हिसक्यासरशी तोल जाऊन कोतवाल खासा विहिरीत पडला. धावा! कुणीतरी धावा' अशा हाका मदतीसाठी मारू लागला. पण त्या भयाण वेळी त्याच्या ओरडण्याकडे कोण लक्ष देणार? मात्र विहिरीवरून कुणीतरी त्याला खिजवीत म्हणाले: 'खुशाल पहाटेपर्यंत पोहत राहा आत; आता माझा मार्ग मोकळा झाला! पहाटेला कुणीतरी येऊन सुटका करील तुमची. बराय्,राम राम!'

आणि एवढे बोलून, तरुणीच्या वेषात कोतवालाला तिथेच सोडून शबरंग स्वतः कोतवालाच्या वेषात आपल्या कामगिरीवर निघून

गेला. विहीर पडकी असल्याने सुदैवाने आत जास्त पाणी नव्हते. त्यामुळे कोतवालसाहेब न बुडता आत अडकून पडले एवढेच.

दुसऱ्या दिवशी सकाळी कोतवालाची आरडाओरड ऐकून लोक विहिरीकडे धावून गेले. आणि बाईच्या वेषातील कोतवालाची ती दशा पाहून त्यांना हसता हसता पुरेवाट झाली. प्रत्यक्ष कोतवालाला हातोहात बनवून-नव्हे, त्याची फटफजिती करून त्याच्या हातावर तुरी देणाऱ्या चोराचे लोकांना कौतुक वाटल्याशिवाय राहिले नाही. त्याचा पक्का बंदोबस्त करण्यासाठी जास्त खबरदारी घेणे आवश्यक आहे असा पुकाराहि त्यांनी, राजवाड्याच्या आवारात जमून केला.

खुद्द कोतवालच चोरापुढे चारीमुंडे चीत झालेला पाहून राजा हतबुद्धच झाला. काय करावे ते त्याला सुचेना. आता प्रत्यक्ष प्रधानानेच चोराचा छडा लावण्याची कामगिरी पत्करावी असे त्याने फर्मावले.

प्रधानाला काही गल्लीबोळातून रात्रीची गस्त घालण्याचा सराव नव्हता. परंतु राजाच्या हुकुमानुसार कामगिरी बजाविणे भाग होते. घोड्यावर बसून तो सावकाश फेरफटका मारू लागला. घोड्याच्या टापांचा आवाज रात्रीच्या शांत वेळी सगळीकडे घुमत होता. एवढ्यात एके ठिकाणी दिव्याचा मिणमिणता उजेड त्याला दिसला. म्हणून, काय ते पाहाण्यासाठी प्रधान जवळ गेला. तर, चेहऱ्याला सुरकुत्या पडलेली एक म्हातारी रस्त्याच्या बाजूला बसून काहीतरी दळीत असलेली त्याला दिसली.

'एवढ्या अपरात्री दळत बसायचं काय कारण आजीबाई?' प्रधानजींनी विचारले, 'आणि काय हो, आपला तो बदमाश ठकसेन इथं कुठं दिसला का तुम्हांला?'

"मला 'होय' असं म्हणता येत नाही, तसंच 'नाही' असंहि म्हणता येत नाही." आजीबाई चिरक्या आवाजात बोलली. "तसं म्हणाल तर मघापासून नाही नाही ते विचित्र आवाज माझ्या कानी पडतायत. त्यावरून स्वारी कुठंतरी जवळपास असावी खास."



'मग, इथंच पाळत ठेवायला हवी तर!' प्रधानजी म्हणाले, 'वेष बदलून गुपचूप काम साधायला हवं होतं. पण....'

'ते तर खरंच,' आजी बोलली, 'पण वेष बदलायचा असेल तर मी आपली एक हिकमत सुचवते बघा. बेमालूम काम

सापेल. मी देते ते फाटकं लुगडं नेसून तुम्ही माझ्या या जात्यावर दळत बसून राहा. कुणालासुद्धा तुम्हांला ओळखता नाही येणार. कल्पना पटते का पहा.'

प्रधानाला कल्पना पटली आणि फाटके लुगडे नेसून तो जात्यावर दळत बसला. 'तुमचा हा घोडा आडबाजूला कुठं तरी बांधून ठेवते असे सांगून प्रधानाचा घोडा घेऊन ती 'म्हातारी'—म्हणजेच म्हातारीचा वेष घेतलेला शवरंग जरा आडबाजूला गेला; आणि घोड्यावर बसून त्याला पिटाळीत आपल्या रात्रीच्या कामगिरीवर निघाला. त्या रात्री प्रत्यक्ष राजवाड्यातच मोठी चोरी झाली.

दुसऱ्या दिवशी पहाटे फाटके चिरगूट नेसून रस्त्याच्या कडेला बसलेली प्रधानजींची स्वारी पाहून काही लोक एकीकडे हसत होते तर दुसरीकडे त्याची छीः थूः करीत होते.

आता मात्र राजा अगदी वैतागून गेला. भरलेल्या दरबारात तो खवळून बोलू लागला तर दरबारी मंडळी शरमेने माना खाली घालून बसली. राजेसाहेब गरजले, 'तुम्ही लोक बेअक्कल आणि कुचकामी आहात. त्या ठकसेनानं आपणा सर्वांना पार गुंडाळून ठेवलंय. त्यानं सर्वांवर मात केली आहे. काल रात्री प्रत्यक्ष राजवाड्यात चोरी झाली. त्याच्या कर्तबगारीचं आपण कौतुक केलं पाहिजे. म्हणून म्हणतो की.... या ठकसेनानं भर दरबारात येऊन आपली ओळख दिली, तर आम्ही आमचं अर्धं राज्य त्याला बहाल करू. तुम्हां सर्वांहून तो अधिक कर्तबगार आणि चतुर आहे यात शंका नाही.'

राजेसाहेबांचे बोलणे संपते-न संपते तोच शवरंग शांतपणे पुढे सरसावला. त्याने विचारले, ‘हे आपलं वचन आहे का महाराज?’

राजेसाहेब चकित होऊन त्याच्याकडे पहात त्याला म्हणाले, ‘अलबत! वचन म्हणजे वचन!’

सारा दरबार शवरंगकडे एकटक पाहू लागला. सगळीकडे अगदी शांतता पसरली. तेवढ्यात शवरंग आपल्या छातीवर हात ठेवीत म्हणाला,

‘हां! तर आपल्याला हवा तो ठकसेन मीच आहे. महाराज, याची खातरजमा आपल्याला करायची असेल तर पुरावा म्हणून, आतापर्यंत चोरीस गेलेली सर्वच्या सर्व मालमत्ता ज्या त्या मालकास मी परत करतो. महाराज, आपण सांगाल तेव्हा ही कामगिरी मी पार पाडीन.’

राजेसाहेबांचे डोळे आकुंचित झाले. शवरंगबद्दल त्यांना कुतहल नि कौतुक वाटू लागले. त्याची ही कर्तबगारी नि रुबाब पाहून ते त्याच्यावर बेहद्द खूष झाले. त्याला आपली राजकन्या बहाल करण्यासहि ते तयार झाले.

परंतु ‘माझ्या आईला बोलावून घेऊन तिची संमती घेतली पाहिजे. त्याशिवाय मला राजकन्येशी विवाह करता येणार नाही,’ असे शवरंगने सांगितले.

आणि मग निरोप गेला. शबरंगची आई काश्मीरच्या राजेसाहेबांपुढे येऊन दाखल झाली. राजाने छावणीतील मुक्कामात आठवणीदाखल दिलेली आंगठी त्याला दाखवीत म्हणाली, 'महाराज, शबरंग हा तुमचाच मुलगा आहे. मग त्याला तुमच्या मुलीशी कसं लग्न करता येईल?'

यावर राजाने मान हालविली. पण तो अगदी गोंधळात पडला. हा काय प्रकार आहे याचा बोध त्याला होईना. पण शबरंगच्या आईने त्याला जास्त वेळ गोंधळात ठेवले नाही. माहेरच्या बागेत उभयतांची झालेली ती पहिली भेट आणि त्यावेळी उभयतात झडलेले ते सवाल-जवाब यांची आठवण तिने राजेसाहेबांना करून दिली. राजाने आपणाला टाकल्यामुळे आपणालाहि आपले शब्द नाइलाजाने खरे करावे लागले असे तिने सांगितले. ते ऐकून राजाच्या डोळयात अश्रु तरारले. त्याला पश्चात्ताप झाला. त्याबरोबरच आनंदहि झाला. आपल्या राणीला त्याने प्रेमाने मिठी मारली. आलिंगन दिले झाले गेले विसरून उभयतांचे मीलन झाले.

आता तर शबरंगला काश्मीरच्या राज्याचा वारस म्हणून घोषित करण्यात आले. समारंभपूर्वक युवराज्याभिषेकाचा सोहळाहि झाला. अर्थात् आता तो ठकसेन राहिला नव्हता. उलट, राज्यातील चोरांचा पक्का बंदोबस्त त्याने केला. कारण, चोरांच्या युक्त्या, हिकमती त्याला चांगल्या अवगत होत्या.

●●●●

# आकाश कमल

फार फार वर्षांपूर्वी काश्मीरात एक साधू राहात असे. त्यावेळी सबंध काश्मीरात पाण्याचा अवघा एकच प्रवाह होता. आणि तोसुद्धा लोकांच्या वस्तीपासून दूर. त्यामुळे पाणी मिळवायला लोकांना भारी त्रास पडे. एका गावच्या लोकांना तो साधू त्या प्रवाहाचे पाणी रोजच्या रोज पुरवीत असे. आपल्याला जमे तसे एक परोपकाराचे काम करीत असे तो हे.

पण पुढे असे झाले की, त्या गावचा पसारा वाढत वाढत गेला. ते खूपच भरभराटले. शेकडो लोकांनी ते गाव गजबजून गेले. तेव्हा या सर्वांना पाणी पुरवणे एकट्या साधूला काही जमेना.

म्हणून त्याने आपल्या पूज्य देवीची प्रार्थना आरंभली: 'हे देवी, माझ्या भक्तीची तुला काही किंमत वाटत असेल, तर तू ह्या काश्मीरी लोकांच्या पाण्याची काही सोय कर.' अशी तो देवीची करुणा भाकू लागला.

अखेर देवी त्याच्या प्रार्थनेला पावली. प्रसन्न होऊन ती म्हणाली, 'वत्सा, तुला माझं वरदान आहे. तुझी इच्छा पूर्ण होईल. गंगाबळ

सरोवराच्या पलीकडल्या वनात जा आणि तिथलं आकाश कमल नावाचं फूल मिळव. ते फूल एका वस्त्रात घेऊन तू गंगाबळ सरोवरात नेऊन टाक. म्हणजे मागं परतताना त्या सरोवरातील पाण्याचा प्रवाह काश्मीरच्या दरीतून तुझ्यामागून वाहू लागेल.'



मात्र तिने त्याला शेवटी असे बजावले की, फूल सरोवरात टाकून परतताना मागे वळून मात्र पहायचे नाही !'

झाले ! साधूने लगेच त्या वनात जाऊन ते फूल मिळवले आणि गंगाबळ सरोवरात नेऊन फेकले. मग तो परतण्यासाठी वळला; नि वाट चालू लागला. तो काय– जसजसा तो वाट चालू लागला तसतसा पाण्याचा प्रवाह आपला पाठलाग करीत येत आहे, हे त्याने आवाजा-वरून ताडले. 'मागे वळून पहायचे नाही,' असे देवीने बजावले होते. तो इशारा साधूने पक्का ध्यानात ठेवला होता. म्हणून सारखी इच्छा

होत होती. तरीसुद्धा मागे वळून पाहिले नाही त्याने. थेट आपल्या ठरवलेल्या मार्गाने तो पुढे पुढे चालू लागला.

त्या गंगावळ सरोवराचे रक्षण काही यक्ष करीत असत. साधूने चालविलेला हा प्रकार पाहून ते संतापले. साधूला आपण नुसते मागे वळून पहायला भाग पाडले, तर पाण्याचा प्रवाह दरीतून पुढे खाली वहायचा थांबेल, हे त्यांना माहीत होते. म्हणून त्यांनी गुप्त रूपाने त्या साधूच्या मानेवर व पाठीमागून डोक्यावर मारहाण करण्यास सुरुवात केली.

पण त्यांनी कितीहि मारहाण केली तरी साधू काही मागे वळून पाहीना. असाच काही वेळ गेला. मारहाण काही थांबेना. साधू काही दाद देईना. पण दोन-तीन तास ते आघात सहन केल्यानंतर साधू बिचारा जेरीस आला. त्याला तो मार सहन होईनासा झाला. तरीपण मागे वळून न पाहण्याची तो शिकस्त करीत होता.

होता होता अखेर एका यक्षाने स्वतः गांधील माशीचे रूप घेतले. आणि त्या साधूच्या कानामागे कडकडून चावा घेतला.

त्या वेदनेसरशी भान न राहून साधूने 'हुंः!' करीत मान मागे वळविली. नि त्याच क्षणी पाण्याचा प्रवाह वाहायचा थांबला. एवढेच नाही, तर तो परत फिरून गंगावळ सरोवरात जाऊन मिसळून गेला.

बिचारा साधू! त्याची सारी खटपट फुकट गेली. पण तो निराश झाला नाही. त्याने पुन्हा देवतेची प्रार्थना आरंभली.

आपल्या सांगण्याप्रमाणे साधू नीट वागला नाही, म्हणून देवता आता रागावली होती. बराच वेळ ती प्रसन्न होईना.

तरीपण साधूने प्रार्थनेत खंड पडू दिला नाही. दीर्घकाळ प्रार्थना चालूच ठेवली.

अखेर त्याच्या प्रार्थनेला पावणे देवतेला भाग पडले. प्रसन्न होऊन ती म्हणाली, 'हे पहा साधू, गंगेच्या पाण्याचा प्रवाह काही आता तुला देता येणार नाही मला. तरीपण तू असे कर–ज्या वस्त्रातून ते आकाश कमल तू गंगाबळ सरोवराकडे नेलं होतंस ते वस्त्र तू, पाणी हवं असलेल्या जागी पसर. जिथं जिथं ते तू पसरशील तिथं तिथं गंगेच्या पाण्याचा झरा उगवेल.'

आपल्या मागल्या चुकीची थोडी तरी भरपाई झाल्याचे पाहून साधूला मोठा आनंद झाला. मग तो सबंध काश्मीरभर फिरला; आणि सर्व काश्मीरी लोकांची पाण्याची सोय व्हावी म्हणून त्याने ठिकठिकाणी ते वस्त्र पसरले नि गंगेचे झरे उत्पन्न केले.

स्वच्छ ताज्या पाण्याची चांगली सोय झाली. म्हणून सर्व ठिकाणच्या लोकांनी त्या साधूला मनापासून दुवा दिला.

# बदमाश बुवाजी

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. काश्मीर राज्यात एक ढोंगी नि बदमाश बुवाजी राहात होता. बुवाबाजीच्या पांघरुणाखाली तो आपला स्वार्थ बेमालूम साधत असे. लबाड पण हुशार शिष्यांचा मेळावा त्याने आपल्याभोवती जमा केला होता. ते शिष्य वेश पालटून लोकात फिरत आणि बुवाजी चमत्कार करून दाखवितात, ते सांगतात त्याप्रमाणे गुण येतो अशा बातम्या गावात पसरवित. आपल्याला असा असा चमत्कार दिसला नि असा असा गुण आला असे ते छातीवर हात ठेवून सांगत. हळूहळू बऱ्याच लोकांना ते खरे वाटू लागले. लोक बुवाजीच्या नादी लागू लागले. कारण काही लोकाना अडचणी असायच्याच. त्या दूर कशा करायच्या हे ते बुवाजीला जाऊन विचारू लागले. अर्थात ते रिकाम्या हातांनी जाणे शक्यच नव्हते. यथाशक्ती भेटी नेत व बुवाजीचे काम साधे.

बुवाजी वस्ताद होतेच. कधी ते थापा देऊन वेळ मारून नेत तर कधी शिष्यांनी गुपचूप मिळविलेल्या त्या-त्या माणसांबद्दलच्या माहितीवरून ज्याला-त्याला 'चकित' करून सोडीत. बुवाजी स्वतः पैशाला शिवत नसल्याचे लोकांना दाखवित. पण तो भास असे. लोकांचा आग्रह नेहमीच पडे. म्हणून मग 'नाइलाजाने' ते आलेल्या भेटी व

पैसे आपल्या शिष्यांना द्यायला सांगत. अशी बुवाजींची ढोंगबाजी बरेच दिवस बिनबोभाट चालली होती.

एकदा काय झाले, एक गरीब माणूस बुवाजीला भेटायला आला. डोळ्यात आसवे आणून तो म्हणाला,'महाराज, गरीबाला मार्ग दाखवा. माझी मुलगी वाढली आहे. तरुण नि सुन्दर आहे. पण गरीबाची पडली म्हणून तिचं लग्न जमत नाही बघा. म्हणून म्हणतो, दया करा आणि गरीबाला मार्ग दाखवा.'

तरुण नि सुंदर मुलगी म्हटल्याबरोबर बुवाजीला मनातून लोभ वाटला. काही तरी युक्ती योजून ती मुलगी आपणालाच मिळावी असे त्याच्या मनाने घेतले. ती खरीच सुंदर आहे नाही याचीही स्वतः पाहून खात्री करून घ्यायचे त्याने मनातल्या मनात ठरवले. पण बाह्यतः बुवाजी शांत-गंभीर दिसत होते. क्षणभर डोळे मिटून विचारात पडल्याची बतावणी करून मग बुवाजी त्या माणसास समजावू लागले,

'काही काळजी करू नकोस, बेटा. सर्व काही ठीक होईल. परमेश्वर दयाळू आहे. उद्या त्याचा आशीर्वाद घेऊन मी स्वतः घरी येईन आणि तुझ्या बेटीला तो देईन. आता तू खुशाल जा.'

दुसऱ्याच दिवशी सकाळी बुवाजी स्वतः त्या माणसाच्या घरी जाऊन दाखल झाले. खरोखरच बुवाजींनी आपल्या घरी पायधूळ झाडलेली पाहून तो माणूस चकितच झाला. बुवाजींना सामोरे जाऊन त्याने त्यांना मोठ्या आदराने ओटीवर नेऊन बसवले आणि त्यांचा सत्कार केला.

८६४०२ ५१
क्रमांक ३५३६ नोंद दि ३०·३·०७



बुवाजींनी विश्रांती घेतल्यावर त्या माणसाने आपली लग्नाची मुलगी बुवाजींच्या पुढ्यात आणून बसवली. तिने बुवाजींना अदबीने नमस्कार केला आणि ती खाली मान घालून विनयाने बसून राहिली. ती मुलगी खरोखरीच सुंदर होती हे बुवाजींना लगेच कळून चुकले. त्यांनी तिला आत जाण्यास सांगितले.

बुवाजींनी मग त्या माणसाला जवळ बोलावून घेतले. नंतर ते हलकेच त्याला म्हणाले: ‘ ऐक बेटा. तू गरीब आहेस खरा, पण तुझ्या सुंदर मुलीला साजेसा नवरा मिळेल असा ईश्वराचा आशीर्वाद आहे. ईश्वराची लीला अगाध आहे. काही चिंता करू नको ! मी सांगतो तसा ईश्वराच्या सूचनेप्रमाणे वाग. म्हणजे तुझी मुलगी सुखी होईल. नीट ऐक. तुला धीराने मात्र वागायला हवे. ईश्वरावर भार टाकून शांतपणे वाग. एक मोठी लाकडी पेटी घे. तिच्यात तुझ्या या मुलीला गुपचूप ठेव. मग ती पेटी झाकून चांगली बंद कर. वरच्या बाजूला एक भोक ठेव. उद्या सूर्य मावळला की ती पेटी घेऊन बाजूच्या नदीत सोडून दे. मग ती वहात वहात जाईल आणि तिच्या नशीबी असलेल्या गुणी माणसाच्या हाती लागेल. पेटी नदीत सोडून घरी परतल्यावर उरलेली रात्र प्रार्थना करण्यात घालव. पुन्हा सांगतो, काळजी करू नको. ईश्वरावर भरवंसा ठेव. सर्व काही ठीक होईल. ! ’

आणि एवढे सांगून बुवाजी निघून गेले. त्या भोळ्याभाबड्या माणसाचा बुवाजींच्या बोलण्यावर विश्वास बसला. बुवाजींचा डाव त्याच्या लक्षात आला नाही. त्याने बुवाजींच्या उपदेशाप्रमाणे वागायाचे ठरविले.

इकडे आपल्या मठात परतल्यावर बुवाजींनी टाळी वाजवली नि आपल्या शिष्यमंडळीला बोलावून घेतले. ते सगळे जमले तेव्हा बुवाजी त्यांना म्हणाले,

'हे पहा. उद्या आपल्याला एक मोठे कार्य उरकायचे आहे. एक समंध आपल्या शेजारच्या नदीतून, एका मोठ्या पेटीतून तरंगत वहात जाणार आहे. सूर्य मावळल्यानंतर थोड्या वेळाने ती पेटी आपल्या मठापलीकडल्या नदीच्या प्रवाहात येऊन ठेपेल. त्यावेळी तुम्ही मंडळी तिकडच्या त्या लाकडी पुलावर राहा नि दोरखंड वगैरे टाकून ती पेटी पकडा. मग ती अलगद उचला आणि माझ्या झोपायच्या खोलीत आणून ठेवा. पेटीत कोंडलेल्या त्या समंधाला मग मी बाहेर काढीन: आणि त्याच्याशी लढून त्याचा पुरता समाचार घेईन. ईश्वराचा तसा मला आदेशच झाला आहे. मात्र हे काम मी बंद खोलीत एकट्यानं उरकणार आहे. तुम्ही मंडळी बाहेर राहून प्रार्थना करा. तुतारी फुंका; नगारा वाजवा. तुमच्या प्रार्थनेमुळं मला अधिक बळ चढेल आणि त्या समंधाचा मला मग लौकरच नायनाट करता येईल. प्रत्यक्ष परमेश्वराचा मला आधार असल्यामुळं त्या समंधाला मी ठेचून काढीनच काढीन. अर्थात तो खूप आरडा-ओरड करील. पण त्याच्या किंचाळण्याकडे तुम्ही लक्ष देऊ नका. तो समंध असल्यामुळे नाही नाही ते आवाज काढील. वाघांचे नि सर्व प्राण्यांचे त्याला आवाज काढता येतात. म्हणून म्हणतो त्याच्या ओरडण्याकडे तुम्ही बिलकूल लक्ष देऊ नका. उलट नगारा नि तुताऱ्या वाजवून त्याचा आवाज बाहेर ऐकू न येईल असे करा. परमेश्वराच्या इच्छेनुसार मला हे पुण्यकर्म करायचं आहे. त्याचा

उगाच गवगवा होता कामा नये. म्हणून याबद्दल बाहेर कुणाशी बिल-कूल बोलू नका ....सारं प्रकरण गुप्त ठेवा. नाहीतर मला पुण्यलाभ होणार नाही.

बुवाजी सांगताहेत त्याप्रमाणे पेटी मिळाली, तर त्यांना ईश्वराचा दृष्टांत झाला असला पाहिजे खास. असा विचार करून त्यांच्या सांगण्याप्रमाणे वागायचे शिष्यमंडळीने ठरविले.

दुसऱ्या दिवशी सूर्य मावळला. तेव्हा त्या मुलीच्या बापाने बुवाजींच्या सूचनेप्रमाणे वागायला सुरुवात केली. मुलगी बिचारी भांबावून गेली. घाबरून वारंवार घेरी येऊन पडू लागली. पण बापाने शेवटी तिला जबरदस्तीने पेटीत कोंडले आणि कशीबशी पेटी बंद करून ती नेऊन नदीत सोडून दिली.

परंतु त्या मुलीचे नशीब सिकंदर होते. ज्या ठिकाणी ती पेटी



पाण्यात सोडली. तेथून थोड्याच अंतरा-वर नदीकाठी असलेल्या जंगलात एक राजपुत्र शिकारीला आला होता. दिवस-भराच्या श्रमाने थकूनभागून तो नदी-काठी एका झाडाखाली विश्रांती घेत बसला होता. सहज त्याची नजर नदीच्या पात्रावर गेली, तों त्याला ती पेटी वहात जात असलेली दिसली.

राजपुत्राला मोठे नवल वाटले—एवढी मोठी अशी पेटी नदीत कुठून वहात आली? बरोबरच्या शिपायांना सांगून त्याने ती पेटी

किनाऱ्यावर आणायला लावली; आणि ती खोलून पाहिली. तों काय– एक सुंदर तरुणी आतून धडपडून उठली! राजपुत्र चकितच झाला! हा प्रकार आहे तरी काय? तो चमकून दोन पावले मागे सरकला.

त्या भांबावलेल्या सुन्दर तरुणीला राजपुत्राने धीर दिला. तिची हकीगत विचारली. तेव्हा तिने रडत रडत आपली कहाणी त्याला सांगितली. ती ऐकून राजपुत्र म्हणाला, 'अस्सं! पक्का बद-माश दिसतोय् हा बुवाजी! त्याला धडा शिकवितो मी!,



मग, राजपुत्राने बरोबर आणलेल्या शिकारी कुत्र्यांपैकी सर्वात क्रूर कुत्र्याला त्या रिकाम्या पेटीत कोंडले आणि पुन्हा ती बंद करून नदीत सोडावयास लावली. ती पेटी पुढे खालच्या बाजूच्या पुलाकडे वहात जाऊ लागली.

तिकडे पुलावर बुवाजींचे काही शिष्य पेटीच्या वाटेकडे डोळे लावून बसले होते. ती पेटी हळूहळू दिसू लागली. ती पाहताच त्यांना बुवाजींच्या म्हणण्याचा पडताळा आला. ती पुलाजवळ येताच लगेच दोरखंड टाकून त्यांनी ती पेटी उचलून घेतली आणि मग ठरल्याप्रमाणे मठात नेऊन बुवाजींच्या खोलीत ठेवली.

अपेक्षेप्रमाणे पेटी आलेली पाहताच बुवाजी हुरळून गेले. पेटी खोलीत ठेवून शिष्यमंडळी बाहेर जाताच बुवाजींनी आपल्या खोलीची दारे व खिडक्या चांगल्या बंद केल्या. मग उतावीळीने ती

पेटी खोलली. तो काय? अपेक्षित सुंदर तरुणीऐवजी आत एक शिकारी कुत्रा बसलेला. दातओठ चावत त्या माणसाला त्याच्या दगलबाजीबद्दल ते शिव्या देऊ लागले.

तेवढ्यात त्या क्रूर कुत्र्याने चवताळून बाहेर उडी घेतली नि बुवाजींच्या अंगावर झडप घातली. पेटीत कोंडल्यामुळे तो कुत्रा कातावून गेला होता. त्यामुळे खवळून त्याने बुवाजींच्या अंगाचे लचके तोडण्यास सुरुवात केली बुवाजींची कोण त्रेधा उडाली! त्यांनी आरडाओरडा करून आकांत मांडला. पण दारे खिडक्या बंद. ती उघडायला कुत्रा सवड कुठला घायला? शिकारी कुत्रा तो नि त्यात चवताळलेला. त्याने बुवाजींना खाली पाडून त्यांच्या नरडीचा घोटच घेतला. बुवाजींचा आरडाओरडा बाहेरच्या शिष्यमंडळीच्या कानी पडला होता; नाही असे नाही. पण त्यांनीच सांगून ठेवल्याप्रमाणे, ती ओरड समंधाची असेल असे त्यांना वाटले. आणि म्हणून त्यांनी तुतारी जोरजोराने वाजवण्याचा तडाखा चालवला. समंध वाटेल तसला आवाज काढू शकतो असे बुवाजींनी सांगितले असल्याने चवताळलेल्या कुत्र्याच्या आवाजाकडेहि शिष्यमंडळीने दुर्लक्ष केले.

शेवटी, त्या कुत्रारूपी 'समंधाने' बुवाजींचा निकाल लावला!

बुवाजींनी आपला मतलब साधण्यासाठी म्हणून त्या मुलीच्या बापाला दिलेली थाप मात्र योगायोगाने खरी ठरली. मुलीच्या नशीबाने तिला चांगला गुणी नवरा मिळेल असे त्यांनी ठोकून दिले होते. तसे मात्र खरेच घडले. कारण त्या राजपुत्राला ती सुंदर तरुणी आवडली आणि त्याने स्वतःच तिच्याशी लग्न लावून टाकले.

# स्वप्नातली राजकुमारी

कोणे एके काळची गोष्ट. काश्मीरचा राजपुत्र व प्रधानाचा मुलगा हे दोघे जिव्हाळ्याचे मित्र होते. त्यांची दोस्ती एवढी गाढ होती की ते कोणतेहि गुपित एकमेकांपासून लपवून ठेवीत नसत.

एके दिवशी सकाळी उठल्याबरोबर राजपुत्राने प्रधानपुत्राकडे धाव घेतली. प्रधानपुत्राला नाही तरी जरा नवलच वाटले. सकाळीच असे काय विशेष घडले असावे याची कल्पना त्याला करवेना. त्यामुळे त्याने जरा अचंब्यानेच राजपुत्राला विचारले, 'अरेच्चा!.... आज सकाळीच स्वारी एवढ्या गडबडीनं इकडे कुठं वळली बुवा! काही विशेष?'

'थट्टा नाही रे! तसंच काही विशेष सांगायचंय् तुला,' राजपुत्र म्हणाला.

'म्हणजे.... काही नवलाची गोष्ट?' प्रधानपुत्राने विचारले.

'खरोखरीच नवलाची गोष्ट आहे. ऐक तर खरं,' राजपुत्र बोलला. 'काल रात्री स्वप्नात मी एक मोहक राजकन्या पाहिली बघ.'

'असं? वा!....' प्रधानपुत्र उद्गारला.

'हो! कुठल्याशा बागेत फिरताना पाहिलं मी तिला. तिच्याभोवती फुलांचा सुगंध दरवळत होता. तिचं ते सौंदर्य पाहून मी अगदी वेडावून गेलो बघ. माझ्याकडे तिनं एकदा पाहिलं; पण बोलली मात्र नाही काही. हां हां म्हणता लाजून निघून गेली. तिनं माझ्या जिवाला असा काही चटका लावलाय की.... पुनः तिचं दर्शन कधी एकदा घडेल असं झालंय् मला. काय करावं काही सुचत नाही.'

प्रधानपुत्र मोठा चतुर होता. तो म्हणाला— 'काही चिंता करू नकोस. लावू आपण तिचा छडा. आधी मला हे सांग– स्वप्नातली ती बाग कुठल्या दिशेला दिसली तुला?'

'दिशा सहज सांगता येईल रे,' राजपुत्र उत्तरला. 'त्या बागेकडे जाणारी वाट मला चांगली आठवतेय्'

'तर मग बिलकुल अस्वस्थ होऊ नकोस,' प्रधानपुत्र त्याला धीर देत म्हणाला, 'उद्याच आपण त्या वाटेनं जाऊ नि तिचा शोध करू.'

आणि दुसऱ्या दिवशी भल्यापहाटे घोड्यावर बसून ते दोघे मित्र राजधानीतून गुपचूप बाहेर पडले. राजपुत्राने दाखविलेल्या वाटेने दौडत निघाले. दिवस मावळायला आला, तसे ते एका विचित्र नगरीत जाऊन पोहोचले. रस्ते–हमरस्ते ओलांडीत आणि दुतर्फा असलेले मोठमोठाले वाडे न्याहाळीत अखेर ते एका राजवाड्याच्या बागेपाशी येऊन ठेपले. हीच ती बाग होती. आता ते घोड्यावरून खाली उतरले. आडबाजूला एके ठिकाणी घोडे बांधून ठेवले आणि पहारेकऱ्यांची नजर चुकवून ते हळूच बागेत शिरले.

आणि काय आश्चर्य! प्रथमच राजपुत्राच्या दृष्टीस कोण



पडले असेल तर स्वप्नातली ती रूपवान राजकन्या. यावेळी तर ती त्याला स्वप्नातल्याहिपेक्षा कितीतरी जास्त मोहक वाटली. कसल्यातरी फुलाचा वास ती घेत होती. तिचे ओठ यावेळी गुलाबकळयांसारखे दिसत होते.

चाहूल लागताच तिने सहज वर नजर करून पाहिले, तो ती नजर राजपुत्राच्या नजरेला भिडली. तिच्या नजरेच्या जादूने राजपुत्र देहभान विसरून गेला. पण स्वप्नातल्या प्रमाणेच ती एक शब्दहि बोलली नाही. हातातले फूल तिने राजपुत्राच्या दिशेने फेकले आणि कपाळावर आलेल्या केसाच्या बटा मोहक झटक्याने मागे सारीत ती राजपुत्राच्या दृष्टिआड निघून गेली.

मोहित झालेला राजपुत्र काही काळ जागचा हालेचना. शेवटं त्याची समजूत काढीत प्रधानपुत्राने त्याला धीर दिला, आणि बागेबाहेर

नेले. मग राजवाड्यानजीकच्या एका मोठ्या खानावळीत प्रधानपुत्राने दोघांची सोय लावून घेतली. राजपुत्राला त्या राजकन्येचा ध्यास लागला होता. त्यामुळे ती आपल्याला कशी मिळेल या चिंतेने तो हवालदिल झाला होता. त्याला धीर देत प्रधानपुत्र म्हणाला,'आता तिचा ठावठिकाणा आपल्याला समजून चुकलाय्. तेव्हा तू बिलकुल काळजी करू नकोस. तुला ती मिळवून देण्याचे काम मी फत्ते करतो बघ.'

आणि पुढील बेत आखीनच प्रधानपुत्र झोपी गेला

दुसऱ्या दिवशी सकाळीच प्रधानपुत्र बाहेर पडला आणि त्याने राजघराण्याच्या बेकरीवाल्याकडे जाऊन नोकरी धरली. तेथे त्याने एकाहून एक सुरेख रुचकर केक्स बनवल्या. राजकन्येसाठी तर विशेष कलाकुसर केलेल्या फक्कड केक्स त्याने तयार केल्या. यावेळच्या खुमासदार केक्स पाहून राजकन्या थक्क होऊन गेली. तिने लगेच बेकरीवाल्याला बोलावून घेतले आणि विचारले, 'ही काही तुझी कारागिरी खास नव्हे. कुणी बनवल्या या केक्स?'

'मी बनवल्या नाहीत हे तर खरंच आहे सरकार'. बेकरीवाल्याने कबुलीजबाब दिला. 'नुकताच माझ्याकडे एक नवा नोकर येऊन राहिलाय्. आहे अनोळखीच; पण त्यानंच ह्या फक्कड केक्स बनवल्या. खास राजकन्येसाठी ह्या बनवल्यात असं तो सांगत होता.'

'असं? मग त्याला लगेच माझ्याकडे धाडून दे पाहू!' स्वतः राजकन्या असल्याचे विसरून चटकन् राजकन्येने फर्माविले.

काम करतानाच्या वेषातच प्रधानपुत्राला लगेच राजकन्येपुढे आणून उभे करण्यात आले. राजकन्येने त्याच्यावर प्रश्नांचा नुसता

भडिमार केला. प्रधानपुत्राला तर हीच संधी हवी होती. मनातल्या मनात खुषीने हसत राजपुत्राची हकीगत त्याने तिच्या कानांवर घातली. तिच्या सौंदर्याने तो कसा मोहित झाला आहे, तिच्यावर त्याचे कसे प्रेम बसले आहे, आणि तिची त्याला कशी ओढ लागली आहे याचे रसभरीत वर्णन त्याने तिच्यापाशी केले. जवळच एका खानावळीत तो चिंताग्रस्त होऊन बसला आहे अशी माहितीहि त्याने तिला सांगितली. मग तो चिंतेच्या स्वरात म्हणाला, 'मला तर त्याची फार काळजी वाटते, राजकुमारी. त्याचा हा आजार केवळ तुमच्याबद्दलच्या चिंतनामुळे ओढवला आहे. तुमच्या केवळ एखाद्या शब्दानं त्याची कळी खुलेल. खिन्नता पार निघून जाईल नि त्याचं झुरणं थांबेल.'

राजकन्येचा स्वभाव मायाळू होता. त्यामुळे, प्रधानपुत्राने वारंवार केलेल्या विनवण्यांना यश आले. राजपुत्राच्या खोलीवर येऊन त्याला भेट देण्याचे तिने शेवटी कबूल केले. तिने बोलून दाखवले नाही, तरी राजपुत्राला पाहिल्यापासून त्याच्यावर तिचे मन जडले होते. ती म्हणाली, 'आज रात्री बरोबर बारा वाजता मी येऊन त्याला भेटेन.'

प्रधानपुत्राने सांगितलेले राजकन्येचे आश्वासन ऐकून राजपुत्र बेहद्द खूष झाला. तिची भेट इतक्या लौकर होणार या कल्पनेनेच तो इतका हुरळून गेला की त्या समाधानातच रात्री तो पडल्या पडल्या झोपी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी सूर्याची कोवळी किरणे अंगावर पडलेली पाहून राजपुत्र दचकून जागा झाला. आधल्या रात्री राजकन्या भेटीला येणार होती ही गोष्ट त्याला आठवली. तो गडबडीने उठला आणि दोस्तापाशी-प्रधानपुत्रापाशी जाऊन निराशेने उद्गारला 'अखेर ती आलीच नाही म्हणायची! आपला शब्द पाळला नाही तिनं!'

मात्र प्रधानपुत्राला ही गोष्ट खरी वाटेना. तरीपण राजपुत्राच्या अंगावर हात फिरवीत त्याचे तो सांत्वन करू लागला. तोच राजपुत्राच्या अंगरख्याच्या वरच्या खिशात त्याला अनोळखी गुलाबी रेशमी हातरुमाल दिसला. आणि तो काढून पहातो तो काय? त्यावर राजकन्येचे नाव. तिथला राजपुत्राचा हातरुमाल नाहीसा झालेला. हा प्रकार पाहून तो राजपुत्राला म्हणाला, " आपलीच स्वारी कमनशीबी दिसतेय्. ती तर ठरल्याप्रमाणं येऊन गेलेली दिसते. आपली स्वारी त्यावेळी गाढ झोपून गेली असावी हे नक्की ! '

आता मात्र राजपुत्राची स्वारी रडायला टेकली. जिच्यासाठी आपण एवढे तळमळतोय ती प्रीतिदेवता प्रत्यक्ष येऊन गेली आणि आपण त्यावेळी एखाद्या बैलोबासारखं गाढ झोपून राहिलो हे लक्षात येताच तो शरमिंदा झाला. आपल्यासारखे हतभागी आपणच असे म्हणून तो स्वतःला दोष लावू लागला.

प्रधानपुत्राला त्याची दया आली. राजपुत्राला समजावीत तो म्हणाला, 'हे बघ दोस्त, झाली गोष्ट होऊन गेली. यातून आपल्याला मार्ग काढला पाहिजे. तुझ्या या करणीमुळं ती रागावली असेल यात शंका नाही. तरीपण पुन्हा तिचं मन वळवण्याची मी शिकस्त करतो. जिवाला लावून घेऊ नकोस. '

अशा प्रकारे त्याला धीर देऊन प्रधानपुत्र पुन्हा राजकन्येच्या भेटीला गेला. अर्थातच ती घुश्शात होती. प्रधानपुत्र तरी आपल्या दोस्ताची लंगडी बाजू कशी काय सावरणार? तरीपण त्याने वेळ मारून नेली. तो म्हणाला, ' राजकुमारी, त्याचं असं झालं, की मी काल इकडे आलो असता तुमच्या चिंतनाच्या भरात तो भटक भटक

भटकला, त्यामुळं तो पार थकून गेला होता. साहजिकच तुमची वाट पहात बिछान्यावर पडल्या पडल्या त्याचा डोळा लागला. पण आता कधी तसं होणार नाही अशी मी खात्री देतो.'

राजपुत्र आपले चिंतन करीत राहिल्यामुळं शेवटी तसा प्रकार घडला हे समजताच राजकन्या नाहीतरी मनातून सुखावली. तरीपण बाहेरून तसे काही दिसू न देता ती म्हणाली, 'हे पहा, आणखी एक वेळ–आज रात्री मी येईन. यावेळी भेट झाली नाही, तर मात्र तुमचे दोस्त आणि तुम्ही स्वत:च्या नशीबाला दोष देत बसा.'

आता या खेपेला राजपुत्र चांगला जागा राहिला असेल हे काय सांगायला हवे? राजकुमारी तर खूपच देखणी दिसत होती. कारण यावेळी तिला अगदी जवळून न्याहाळता येत होते. दोघांनाही एक-मेकांच्या प्रेमाची खात्री पटली. जिवाभावाच्या गप्पा झाल्या. राजपुत्राला तर आपण स्वर्गात असल्याचा भास होत होता.

परंतु दैवाला ही गोष्ट पाहवली नसावी. कारण, तेवढ्यातच नगरीचा कोतवाल बाजूच्या रस्त्याने फेरी घालत जात होता. तरुणीचे हसणे–खिदळणे कानी पडले, म्हणून एका हाताने मिशीला पीळ देत व दुसरा हात कंबरेवर ठेवीत त्याने नीट कान देऊन ऐकले.

तों तो आवाज त्याला चांगला परिचयाचा वाटला. 'अरेच्चा! ...हा तर आपल्या खट्याळ राजकुमारीचा आवाज!' कोतवाल स्वत:शीच उद्गारला.

राजकुमारीबद्दल कोतवालाच्या मनात आधीच अढी होती. ही त्याला संधी मिळाली. मग काय? तिची चांगलीच खोड मोडायचे

त्याने ठरवले. आणि लगेच दोनतीन नगररक्षक बरोबर घेऊन तो बेधडक त्या खाणावळीत शिरला. राजपुत्र व राजकन्या यांना त्याने बाहेर काढले व त्यांची कोठडीत रवानगी करण्यास रक्षकांना फर्मावले. जाता जाता तो खवचटपणे म्हणाला, 'तुमच्या प्रेमाच्या गप्पा ऐकून मी खूप झालोय्. म्हणून हे बक्षीस बरं का!'

प्रधानपुत्राला ही दुर्दैवी घटना कळताच तो हतबुद्धच झाला. परंतु एवढे असूनहि तो निराशेने खचून गेला नाही. काही झाले तरी तो डोकेबाज होता. रात्रभर विचार करकरून अखेर त्याने काही एक शक्कल लढविण्याचे ठरवले.

पहाट झाली तसा त्याने म्हातारीचा वेश घेतला. माथ्यावर फळांची एक टोपली घेतली नि वाकून हातातील काठी टेकीत टेकीत ही 'म्हातारी' खडत खडत रस्ता चालू लागली. अखेर ती म्हातारी कोठडीच्या दाराशी जाऊन पोचली. पहारेकऱ्यांना विनवू लागली, 'बाबांनो, मला जराशी आत सोडा. एवढं खायचं आणलंय ते त्या दोघांना नेऊन देते नि लागलीच परत येते. माझा म्हातारीचा जीव स्वस्थ बसेना म्हणून एवढी धडपडत आले बघा. नाही नका म्हणू.'

तिच्या या विनवणीला पहारेकरी प्रथम बधेनात. पण केवळ दयाबुद्धीने ती आली आहे, हे पाहून त्यांनाहि अखेर तिची दया आली. एवढी धडपडत त्या बिचाऱ्यांना काही खायला द्यायला आली आहे, तर तिला कसं अडवायचं? 'मात्र लौकर परत ये हो!' असे बजावून अखेर त्यांनी तिला आत सोडले.

आत गेल्याबरोबर काय विचारता? – म्हातारीला एकदम नवा जीव फुटला; तरतरी आली. तुरुतुरु चालत तिने राजपुत्राची कोठडी

गाठली. म्हातारीच्या वेशात प्रधानपुत्राला पाहून राजपुत्र नि राजकुमारी या दोघांनाहि मोठा अचंबा वाटला. त्याच्या धाडसाचे कौतुक वाटले. पण वेळ दवडण्यात अर्थ नव्हता. राजकुमारीने आपला म्हातारीचा वेश चढवून लगेच बाहेर पडावे, नि रखडत रखडत घरी, राजवाड्यातील आपल्या महालात निघून जावे ही आपली शक्कल प्रधानपुत्राने सांगितली. शक्कल मोठी चतुराईची तर खरीच. पण ती ऐकून हंसावे की रडावे हे राजकुमारीला क्षणभर कळेना. पण कोतवालाच्या सापळ्यातून सुटायला तोच एक मार्ग होता. सर्वांचे हित त्यात साधण्यासारखे होते हे लक्षात घेऊन राजकुमारीने कसाबसा म्हातारीचा वेश चढवला आणि त्या दोघांचा दुःखाने निरोप घेऊन ती रखडत-रखडत बाहेर पडली. पहारेकऱ्यांचे आभार मानताना तोंड पदराआड लपवीत नमस्कार करून वेळ मारून नेली. ती सहीसलामत सुटली. आडवाजूने जात जात ती थेट आपल्या महालात गेली. इकडे कोठडीत राजकुमारीची साडी पेहरून प्रधानपुत्र थमून राहिला.

त्यानंतर थोड्याच वेळात, संतापलेल्या राजाला घेऊन कोतवाल तुरुंगात आला. कोठडीत शिरल्याबरोबर राजकुमारीची साडी पेहरलेल्या प्रधानपुत्राकडे बोट दाखवीत तो राजाला मोठ्या ऐटीने म्हणाला: 'ही पहा आपली आवडती राजकन्या, महाराज.'

प्रधानपुत्राने माथ्यावरून घेतलेला साडीचा पदर तोंडावर ओढून घेतला होता. राजेसाहेब तरातरा पुढे गेले नि त्यांनी तोंडावरचा तो पदर बाजूला सारून चेहरा न्याहाळला. तो काय- कुठली राजकन्या नि कुठले काय!....आपली नाहक फसवणूक केल्याचे पाहून राजेसाहेब आता उलट कोतवालावरच भयंकर संतापले. आणि आपल्या

लाडक्या कन्येवर भलता आळ घेतल्याबद्दल त्यांनी तलवार चालवून कोतवालाचे शिर तत्काळ धडावेगळे केले. मग राजपुत्र नि प्रधानपुत्र यांना ताबडतोब सोडून देण्यात आले हे सांगायला नकोच.

परंतु या प्रसंगातून सुटल्याचा आनंद त्यांना फार वेळ लाभला नाही. कारण, शेजारच्या एका देशाच्या राजाशी राजकुमारीचे लग्न लौकरच होणार असल्याचे वर्तमान तेवढ्यात नगरीभर पसरले होते. ते ऐकून राजपुत्र तर पार निराश झालाच. पण प्रधानपुत्रालाहि यावर काही उपाय सुचेना

अखेर लग्नाचा दिवस येऊन ठेपला. सारी नगरी शृंगारण्यात आली. संध्याकाळचा मुहूर्त होता. राजकुमारीला नटवून-सजवून मेण्यात बसवण्यात आले आणि विवाह समारंभस्थळाकडे मिरवणूक निघाली. वाटेत नगरीच्या वेशीजवळील कुलदेवतेचे दर्शन घेण्यासाठी मिरवणूक तिकडे वळविण्यात आली. पण देवालयाकडे मिरवणूक पोचण्यापूर्वीच जोराचे वादळ सुरू झाले. आधीच काळोख दाटत चाललेला. त्यात वादळाची वावटळ उठली. मग काय विचारता! मिरवणुकीतील सारे लोक सैरावैरा पळत सुटले. बत्त्या विझल्या. त्यामुळे काळोखात काही दिसेनासे झाले. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात राहील तर शपथ! मेणा टाकून भोईहि पळाले.

एवढ्यात ही संधी साधून प्रधानपुत्र बुरखा घेऊन पुढे सरसावला. मेण्यातील राजकन्येला त्याने गाठले. ती तर गोंधळून गेली होती. त्याने तिला राजपुत्राबरोबर पळून जायचा बेत सांगितला. तेव्हा मात्र ती यायला तयार झाली. मेण्यात राजकुमारीसोबत तिची मैत्रीण

प्रधानकन्या बसली होती. तिलाहि प्रधानपुत्राने विश्वासात घेतले. त्याची हकीकत राजकुमारीकडून तिला आधीच समजली होती. तिला तो आवडला होता, नि त्याच्यावर ती खूष झाली होती. अर्थात तीहि त्याच्याबरोबर यायला कबूल झाली. मग काय विचारता? दोघींनाही घेऊन प्रधानपुत्र गुपचूप वेशीबाहेर पसार झाला. ठरलेल्या जागी राजपुत्र दोघांच्याहि घोड्यांसह तयार होता.

राजपुत्राच्या स्वाधीन राजकुमारीला करून प्रधानपुत्र तिच्या मैत्रिणीला–प्रधानकन्येला घेऊन स्वतः आपल्या घोड्यावर स्वार झाला. लगेच ते दोघे आपल्या भावी पत्नीसह मारे दौडत निघाले. आणि दुसऱ्या दिवशी सकाळीच ते आपल्या नगरीत येऊन दाखल झाले.

त्यांना पाहून सर्वांना आनंद झाला! कारण, खूप शोध करूनहि त्यांचा तपास लागेना म्हणून सर्वांनी त्यांची आशा सोडली होती. आणि आता तर हे दोघेहि रूपवान तरुणींसह परत आले होते. अशा स्थितीत आनंदीआनंद झाला नसता तरच नवल!

त्यानंतर तावडतोबीचा मुहूर्त पाहण्यात आला आणि राजपुत्र नि प्रधानपुत्र यांचे विवाह अतिशय थाटामाटाने साजरे झाले हे काय सांगायला हवे?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ०६७०२ दि. ...
क्रमांक 3434 नोंद दि. 30.3.८८

म. ग्रं. सं. ठाणे,
वा. क्र. 92699
दि. ...

IRBK-0112811